दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

एक शाम देश के शहिदो के नाम २६ जानेवारीला केळझर येथे कार्यक्रमाचे आयोजन प्रगतीशील बहुउद्देशीय संस्थेचा देशप्रेमी उपक्रम

प्रशांत झाडे सेलू : प्रगतीशील बहुउद्देशीय संस्था वाशिम या संस्थेमार्फत ' एक शाम देश के शहिदो के नाम ' या देशभक्तीवर कार्यक्रमाचे आयोजन प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारी रोजी केळझर येथील सुनिता नर्सीग कालेजमध्ये संस्थेचे सचिव नरेंद्र सूर्यवंशी यांनी केले आहे.या कार्यक्रमाला ग्रामपंचायत कमेटी, विष्णु स्पोर्टिंग क्लब, कृषी आदिवासी क्रिडा मंडळ, मित्र परिवार स्पोर्टिंग क्लब, स्वातंत्र्य स्पोर्टिंग क्लब, साईबाबा स्पोर्टिंग क्लब, व राणी दुर्गावती स्पोर्टिंग क्लब आदिचा सहभाग असणार आहे. या संस्थेमार्फत सतत विविध सामाजिक, सांस्कृतिक तसेच जनहित उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन केल्या जात असते. आपल्या देशासाठी बलिदान देणारे शहिदांच्या रक्तांची विद्यार्थ्यांना व परिसरातील नागरिकांना जाणीव असावी . या उद्देशाने आयोजन केले असल्याचे संस्था सचिव नरेंद्र सूर्यवंशी यांनी सांगीतले आहे.

■(आष्टी) वर्धा ■मंगळवार, दि.२३ जानेवारी २०२४ ■ वर्ष २ रे ■अंक १९७ ■पृष्ठ ४ ■मुल्य ५.०० ■मुख्यसंपादक : राहुल गजरे ■कार्यकारी संपादक : अवधूत शेंद्रे RNI NO : MAHAR/2020/82242

योध्येतील राम मंदिर हे भारताच्या नव्या अस्मिता पर्वाची सुरुवात : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर ■ दिलीप येवले

राम लल्लाचे दर्शनाला सर्व सोबत जावूया: प्रतिष्ठापना सोहळ्याच्या थेट प्रक्षेपण सोहळ्यात सहभाग: रामनगर येथील मंदिरात राम दर्शन



नागपूर : अयोध्येत भव्य राम मंदिरातील गर्भगृहात राम लल्ला विराजमान होत आहे. हा सर्व भारतीयांसाठी आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण असून भारताच्या नव्या अस्मिता पर्वाची सुरुवात आहे. समाजातील सर्व घटकांना समान अधिकार मिळण्याचा क्षण असल्यामुळे आपण सर्व राम ललाच्या दर्शनाला अयोध्येला जावूया, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

अयोध्या येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राम मंदिराचे लोकार्पण होवून गर्भगृहात राम लल्ला विराजमान होणाऱ्या क्षणाचे साक्षीदार होत असल्याचा अभिमान आहे. हा क्षण रामनगर येथील राम मंदिराच्या परिसरात लावण्यात आलेल्या भव्य स्क्रीनवर बघण्यासाठी श्री. फडणवीस उपस्थित होते. या सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

श्रीराम जन्मभूमी ट्रस्टतर्फे आयोजित या कार्यक्रमास उत्तर भारतीय मोर्चाचे सुरेंद्र पांडे, माजी आमदार डॉ. आशिष देशमुख, शैलेश जोगळेकर, संजय बंगाले, जयप्रकाश गुप्ता, शाम पत्तरकीने, प्रणिता फुके, अश्विनी जिचकार, संदीप गवई आदी उपस्थित होते.

भारतीय इतिहासात २२ जानेवारी हा महत्त्वाचा दिवस असल्याचे सांगतांना उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले , राम जन्मभूमीसाठी अनेक आंदोलने झाली. तसेच स्वातंत्र्यानंतर यासाठी संकल्प करण्यात आला. राजकीय स्वातंत्र्यासोबत आध्यात्मिक स्वातंत्र्यासाठी सुरु असलेल्या आंदोलनामुळे अयोध्या येथे भव्य राम मंदीर पूर्ण झाले आहे.

कारसेवकांचे बलिदान तसेच कोठारी बंधू यांनी भगवा प्रस्तापित करण्यासाठी केलेला संघर्ष अतुलनिय होता. सर्वांच्या त्यागातून व बलिदानातून आज भव्य राम मंदिर निर्माण झाले आहे. त्यामुळे राम लल्लाचे दर्शन घेण्यासाठी सर्वांना अयोध्येला जायचे आहे. त्यासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात येणार आहे.

श्री. फडणवीस यांनी रामनगर येथील मंदिराला भेट देवून श्रीरामाचे दर्शन घेतले. अयोध्या येथील श्रीराम मंदिरात राम लल्लाच्या मूर्ती प्रतिष्ठापणेचा क्षण सर्वांना अनुभवता यावा तसेच या क्षणाचे साक्षिदार होता यावे यासाठी या परिसरात एलएडी स्क्रीनद्वारे या सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करण्यात आले होते. सुमारे तीन तास चाललेल्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवाला मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते. यावेळी कारसेवक म्हणून उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचा श्रीराम जन्मभूमी ट्रस्टतर्फे गौरव करण्यात आला. बंजारा समाजाच्या महिलांनी पारंपारिक नृत्य करुन राम जन्मभूमी उत्सवामध्ये आपला सहभाग नोंदविला.

सेल्फीचा मोह बेतला भावाच्या जीवावर, बहिणी वाचल्या तो बुडाला

दै, जनप्रभात मराठवाडा
उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित



पुणेः- पुण्यातील पानशेत धरणाच्या सांडव्यात उतरून सेल्फी काढताना बुडणाऱ्या बहिणींना वाचवताना भावाचा बुडून दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडलीय. बुडणाऱ्या दोन बहिणींना स्थानिक युवकांनी जीवाची बाजी लावून वाचवलंय, मात्र यात ज्ञानेश्वर बालाजी मनाळे याचा दुर्दैवी मृत्यू झालाय. ज्ञानेश्वरच्या मृत्यूने पानशेत परिसरातील नागरिकांनी हळहळ व्यक्त केलीय.

पानशेत धरणाच्या वेगाने वाहणाऱ्या सांडव्यातील पाण्यात उतरुन सेल्फी काढताना बुडणाऱ्या दोन बहिणींना वाचवताना सख्ख्या भावाचा बुडून दुर्देवी मृत्यू झाला. ही घटना आज रविवारी (२१) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास घडली. बुडणाऱ्या दोन बहिणींना स्थानिक युवकांनी जीवाची बाजी लावून जीवनदान दिले.

ज्ञानेश्वर बालाजी मनाळे (वय १८रा. खराडी, पुणे) असे मयत भावाचे नाव आहे. अनुसया बालाजी मनाळे आणि मयुरी बालाजी मनाळे अशी दोन बहिणींची नावे आहेत. स्थानिक युवक साईराज संतोष रायरीकर आणि करण बाबुराव चव्हाण आरडाओरडा ऐकून सांडव्यात उड्या मारत बुडणाऱ्या अनुसया आणि मयुरी यांना जीवाची बाजी लावून बाहेर काढले, त्यामुळे त्यांचे प्राण वाचलेत. घटनेची माहिती मिळताच पानशेत पोलिस चौकीचे पोलिस हवालदार पकंज मोघे, अंमलदार कांतीलाल कोळपे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर सह्याद्री आपत्ती व्यवस्थापनचे पथक तसेच पुणे महानगर प्राधिकरणाच्या अग्निशमन दलाचे जवान दाखल झाले.

पाण्याच्या कडेला उभे राहून ते सेल्फी काढत होते. त्या वेळी अनुसया मनाळे ही पाय घसरून पाण्यात पडली तिला बाहेर काढण्यासाठी तिची बहीण मयुरी ही पाण्यात उतरली मात्र वेगाने वाहणाऱ्या पाण्यात दोघीजणी बुडू लागल्या त्यावेळी त्यांना वाचविण्यासाठी भाऊ ज्ञानेश्वरने अंगावरील कपड्यांसह पाण्यात उडी मारली. पाण्याचा अंदाज न आल्याने काही क्षणातच ज्ञानेश्वर बुडून बेपत्ता झाला. सुदैवाने यावेळी घटनास्थळी असलेल्या साईराज रायरीकर आणि करण चव्हाण स्थानिक युवकांनी पर्यटकांच्या मदतीने दोघींना सुखरूप पाण्याबाहेर काढले.

आपत्ती व्यवस्थापनचे तानाजी भोसले चोंडे, संदीप सोलसकर आणि आबाजी जाधव तसेच अग्निशमन दलाच्या जवानांनी एकाच वेळी सांडव्यात उतरून दोन्ही बाजूला ज्ञानेश्वर याचा शोध सुरू केला. दोन तासांच्या शोध मोहीमे नंतर सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास आपत्ती व्यवस्थापनचे कार्यकर्ते संदीप सोलकर याला सांडव्याच्या एका बाजूला खोल पाण्यात ज्ञानेश्वर चा मृतदेह सापडला. मृतदेह बाहेर काढून तिरावर आणला. शव विच्छेदनासाठी मृतदेह पुण्यात रुग्णालयात नेण्यात आला.सह्याद्री आपत्ती व्यवस्थापन पथक आणि पुणे अग्निशमन दलाचच्या जवानांना दोन तासांच्या शोध मोहीमे नंतर ज्ञानेश्वरचा मृतदेह शोधण्यात यश आलंय.

प्रेयसीच्या आईचा बेल्टने गळा आवळून खून; पुणे हादरलं



दै, जनप्रभात मराठवाडा
उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित

पुणेः- सतत होणाऱ्या वादामुळे तरुणीने प्रेमसंबंध तोडले. तसेच तिच्या आईने देखील त्यांच्या नात्याला विरोध केला. या रागातून तरुणीच्या प्रियकराने प्रेयसीच्या आईचा बेल्टने गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना पाषाण परिसरातील एका उच्चभ्रू सोसायतीत घडली. वर्षा क्षिरसागर (५८) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी मृण्मयी जगदीश क्षीरसागर या तरुणीने चतु:शृंगी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

त्यावरून शिवांशू दाचाराम गुप्ता (२३, रा. मोहननगर, येरवडा) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १८ जानेवारीला घडली. मात्र, सुरूवातीला आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. त्यांनतर खुनाचा उलगडा झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुणी आणि आरोपीचे गेल्या सात महिन्यांपासून प्रेमसंबंध होते. मात्र त्यांच्यात विविध कारणांवरून सातत्याने वाद होत होते. त्यामुळे तक्रारदार तरुणीने यापुढे प्रेमसंबंध ठेवण्यास नकार दिला होता.

तरुणीच्या आईने देखील या दोघांच्या प्रेमसंबंधाला विरोध केला होता. तसेच प्रेमसंबंध ठेवायचे नाही, असे बजावले होते. त्याचा आरोपीला राग आला होता. घटनेच्या दिवशी तक्रार करून घरी नसताना आरोपी त्यांच्या घरी आला. त्याच घरातील कुत्र्याला बांधण्याकरीता असलेल्या बेल्टने तरुणीच्या आईचा गळा आवळून त्यांना जीवे ठार मारले. त्यानंतर त्यांचा मृतदेह बेडरुममध्ये ठेवला आणि आरोपी तेथून निघून गेला.

सूडाच्या भावनेतून भावकीतील महिलेने चिमुकल्या बहीण-भावाला संपवलं

दै, जनप्रभात मराठवाडा
उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित



बीडः-बीडमध्ये सूडाच्या भावनेतून भावकीतील महिलेने चक्क चिमुकल्या बहीण व भावास उंदीर मारण्याचे विषारी औषध पाजून कायमचं संपवलं आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली असून, पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. २९ डिसेंबर २०२३ रोजी घडलेल्या या घटनेचा तब्बल २० दिवसानंतर खुलासा झाला आहे. तनुजा (वय २ वर्ष) व किशोर अमोल भावले (वय १३ महिने) अशी मयत चिमुकल्यांची नावे आहेत. स्वाती उमाजी भावले असे आरोपी महिलेचे नाव आहे.शेजारी महिलेच्या सांगण्यावरून केली हत्या अन् मृत्यूचे खरे कारण समोर आले.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गेवराई तालुक्यातील पांढरवाडी येथील तनुजा आणि किशोर या बहीण-भावाला २९ डिसेंबर रोजी दुपारच्या सुमारास अचानक उलट्या होऊ लागल्या होत्या. त्यामुळे नातेवाईकांनी दोघांना तात्काळ रुग्णालयात दाखल केले. १३ महिन्याच्या किशोर याला बीडच्या एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले, तर तनुजाला छत्रपती संभाजीनगरच्या एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोघांवर उपचार सुरु असतानाच उपचारादरम्यान शनिवार ३० डिसेंबर रोजी मुलगी तनुजा हिचा तर मुलगा किशोर याचा १ जानेवारी रोजी मृत्यू झाला. दोघांचाही अंत्यविधी पांढरवाडी येथे झाला. याप्रकरणात सुरूवातीला तलवाडा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र, पुढे हा खुनाचा प्रकार असल्याचे समोर आले.

शेजारी महिलेच्या सांगण्यावरून केली हत्या

एक ते दिड महिन्यापुर्वी शेजारी राहणाऱ्या सखुबाई ज्योतीराम भावले हिने आरोपी स्वाती हिचा सासरा सुखदेव भावले याने माझी लेक वैशाली हिला नांदु दिले नाही. मला त्याचा बदला घ्यायचा आहे असे म्हणून मयत मुलांची चुलती म्हणजेच मुलांना औषध देणारी आरोपी स्वाती हिला मुलांना औषध खावू घालण्यास सांगितले. मात्र, स्वातीने त्या महिलेला नकार दिला. त्यानंतर पुन्हा १५ दिवसांनी शेजारी राहणाऱ्या सखुबाई भावले हिने स्वातीला 'मी तुला चार लाख रूपये देईल, तेवढं काम कर, तुझा कोणाला संशय येणार नाही, तु असे केल्यास तुझी जाऊ येथे राहणार नाही, मग तु एकटीच इथे राहशील' असे सांगितले. त्यानुसार सखुबाई भावले आणि स्वाती भावले या दोघींनी संगनमताने कट रचला आणि २९ डिसेंबर रोजी दुपारच्या सुमारास सखुबाई हिने आणून दिलेले उंदिर मारण्याच्या ट्युबमधील औषध स्वाती हिने बोटावर काढून तनुजा आणि किशोर या दोघांना चाटविले. त्यानंतर त्यांना उलट्या झाल्या आणि उपचार सुरू असतांना दोघांचा मृत्यू झाला.

अन् मृत्यूचे खरे कारण समोर आले

या प्रकरणात पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती. मात्र, १९ जानेवारी रोजी मयत मुलांची चुलती स्वाती उमाजी भावले ही शेतात काम करत असतांना तिला कुणीतरी मारहाण केली. याविषयी नातेवाईकांनी तिच्याकडे विचारणा केली असता तिने किशोर आणि तनुजा यांच्या मृत्युच्या कारणावरुन मी कुणाला काही सांगू नये म्हणून शेजारी राहणाऱ्या सखुबाई ज्योतीराम भावले हीने दोन अनोळखी मुलांना मला मारहाण करण्यासाठी पाठवले होते असे कुटुंबियांना सांगितले. त्याचवेळी किशोर आणि तनुजा यांच्या मृत्यूचे खरे कारण समोर आले.

महाराष्ट्राच्या भूमीत पर्यटनाच्या अमर्याद संधी - पर्यटन मंत्री गिरीश महाजन

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई फेस्टिव्हल २०२४ मध्ये 'महा मुंबई एक्स्पो'चे उद्घाटन



'महा मुंबई एक्स्पो' मध्ये महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रतिभेचे आणि मुंबई शहराचे बहुआयामी सौंदर्य मांडण्यात आले आहे. मुंबई फेस्टिव्हल अंतर्गत सुरु असलेल्या 'महा मुंबई एक्स्पो' ला सर्वांनी जरुर भेट द्यावी, असे आवाहन पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी केले.

महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती आणि वैविध्य दर्शविणाऱ्या मुंबई फेस्टिव्हल २०२४ मधील 'महा मुंबई एक्स्पो' चे उद्घाटन वांद्रे-कुर्ला संकुलातील एमएमआरडीए मैदानावर मंत्री श्री. महाजन यांच्या हस्ते करून मुंबई फेस्टिव्हल २०२४ ची सुरुवात झाली. शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री व मुंबई शहराचे पालकमंत्री दीपक केसरकर, जपानच्या ओकायामा विधानसभेचे अध्यक्ष मरियामा, राज्याच्या पर्यटन सचिव जयश्री भोज, पर्यटन संचालनालयाचे संचालक डॉ. बी. एन. पाटील, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी डॉ. राजेन्द्र भोसले, पर्यटन सदिच्छा दूत नवेली देशमुख यावेळी उपस्थित होते.

याठिकाणी २० जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या 'महा मुंबई एक्स्पो' मध्ये, सोमवार ते शुक्रवार या दिवशी दुपारी ४ ते रात्री १० वाजेपर्यंत आणि शनिवार-रविवारी दुपारी १ ते रात्री १० वाजेपर्यंत असेल.या एक्सपोमध्ये महाराष्ट्राची कला, वारसा आणि चिरंतन परंपरा यांचे दर्शन, पारंपरिक खेळांच्या आनंदाशी पुन्हा कनेक्ट व्हायची संधी मुंबईकरांना मिळणार आहे.

मंत्री श्री. महाजन म्हणाले की, या 'महा मुंबई एक्स्पो'च्या माध्यमातून महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती आणि वैविध्य जगासमोर येणार आहे. मुंबईकरांना आणि या महोत्सवात येणाऱ्या प्रत्येकासाठी हा विलक्षण अनुभव असणार आहे. महाराष्ट्राची सांस्कृतिक, सांगितिक श्रीमंती येथे येणाऱ्या प्रत्येकाला अनुभवायला मिळेल. राज्यात पर्यटनाच्या अमर्याद संधी असून देश-विदेशातील नागरिकांनी आवर्जून राज्यातील या स्थळांना भेट द्यावी. यामुळे राज्याच्या पर्यटन विकासाला चालना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शालेय शिक्षण मंत्री श्री. केसरकर म्हणाले की, मुंबई फेस्टिव्हल पुन्हा सुरु झाला असून या फेस्टिव्हलच्या माध्यमातून मुंबई शहराची विविधता मांडण्यासाठी एक चांगल्या प्रकारचे व्यासपीठ आता उपलब्ध झाले आहे. हा फेस्टिव्हल सर्वांचा असून प्रत्येकाचा सहभाग यात महत्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

पर्यटन सचिव श्रीमती भोज म्हणाल्या की, आपल्या परंपरा आणि नावीन्यपूर्ण उपक्रम यांचा समन्वय साधत 'महा एक्स्पो' ची उभारणी करण्यात आली आहे. 'महा मुंबई एक्स्पो' ला प्रत्येक मुंबईकरांनी आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

महामुंबई एक्स्पो २०२४ मध्ये मुंबईतील विविध आणि सर्वोत्कृष्ट वैशिष्ट्ये येथे येणाऱ्या नागरिकांना अनुभवायला मिळतील. भेलपुरी, पाणीपुरी, गोला, कुल्फी यासह मुंबई चौपाटी सारख्या स्टॉलवर मुंबईच्या प्रसिद्ध स्ट्रीट फूडचा विविध पदार्थांची लज्जत आणि आस्वाद घ्यायला मिळेल. मुंबई फेस्टिव्हल २०२४ मध्ये 'टेस्ट ऑफ मुंबई' या नावाने खाद्य पदार्थांचे स्टॉल मांडण्यात आले आहेत. मुंबईतील विविध हॉटेलच्या स्टॉल्समधून स्वादीष्ट पदार्थ आणि पारंपरिक महाराष्ट्रीयन पदार्थांचा आस्वाद घेता येणार आहे. गेम झोनमध्ये व्हर्च्युअल रिॲलिटी गेम्स, बंपर कार, एअरलिफ्ट्स, कोलंबिया बोट्स आणि लाइफ साइज चौपर आणि स्नेक्स अँड लॅडर सारख्या पारंपरिक खेळांसह इमर्सिव्ह थ्रीलचा समावेश आहे. रिटेल झोनमध्ये रिटेल थेरपी असणार आहे. विविध २६ प्रकारचे खाद्यपदार्थ, विविध कलाकुसरीच्या वस्तू, लहान मुलांसाठी खेळणी आदींच्या वस्तूंचे स्टॉल्सही याठिकाणी असणार आहेत.

राठी भाषा, संस्कृतीच्या प्रचार-प्रसारासाठी ग्रंथ प्रदर्शन-सहायक निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावार

वृत्तसंस्था ■ नवी दिल्ली



मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून हा उपक्रम स्तुत्य असल्याचे महाराष्ट्र सदनाचे सहायक निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावार यांनी केले.कस्तुरबा गांधी मार्गस्थित महाराष्ट्र सदन येथे पुस्तक विक्री प्रदर्शन उद्घाटनाप्रसंगी निवासी आयुक्त डॉ. अडपावार बोलत होते. ते म्हणाले की, मराठी भाषेचा राजधानीत प्रचार व प्रसार व्हावा, तसेच मराठी भाषेच्या संवर्धनासाठी राज्यशासनाकडून मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यासारखे विविध उपक्रम राबविले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून राजधानीत ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र सदन आणि महाराष्ट्र परिचय केंद्राच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' राबविण्यात येत आहे. या अंतर्गत महाराष्ट्र सदन येथे ग्रंथ विक्री प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सहायक निवासी आयुक्त डॉ. प्रतिमा गेडाम, स्मिता शेलार यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी आणि सदनातील अभ्यागत उपस्थित होते.

मराठी भाषा संवर्धन हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नाही तर एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. ग्रंथ प्रदर्शन हे अभिनव आणि उपयुक्त उपक्रम असल्याचे सांगून डॉ.अडपावार पुढे म्हणाले, यामुळे मराठी भाषा आणि संस्कृतीचे महत्त्व अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल.या ग्रंथ प्रदर्शनात रसिक साहित्य प्रकाशन,पॉप्युलर प्रकाशन, डायमंड बुक्स, साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट आणि भारतीय साहित्य कला प्रकाशन दालने आहेत. साहित्य, संस्कृती, अर्थविषयक, राजकीय, ऐतिहासिक, वैचारिक अशा विविध विषयांवर आधारित सुप्रसिद्ध लेखकांसह, नवोदित लेखकांची पुस्तके मांडण्यात आली आहेत. पुढील दोन दिवस सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत हे ग्रंथ विक्री प्रदर्शन सुरु राहणार आहे. राजधानीतील मराठी लोकांनी या ग्रंथ प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन महाराष्ट्र सदन आणि परिचय केंद्राकडून करण्यात येत आहे.याठिकाणी परिचय केंद्राच्या वतीने 'लोकराज्य' मासिकाचे दालनही मांडण्यात आले आहे.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्राच्या दर्शनीय परिसरात मराठीमध्ये सुविचार लिहिले जात आहेत.ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनाप्रसंगी सहायक निवासी आयुक्त डॉ. अडपावार यांचे स्वागत उपसंचालक श्रीमती अरोरा यांनी रोपटे देऊन केले. यावेळी सर्व सहभागी प्रकाशकांना रोपटे भेट देऊन स्वागत करण्यात आले.

संपादकीय...

जौ अनीति कछु भाषौ भाई.....

आज २२ जानेवारीस अयोध्येत श्रीराम मंदिराचा उद्घाटन सोहळा. यानिमित्ताने एकंदरच सर्वत्र हिंदू सश्रद्धांच्या आनंदास उधाण आलेले आहे आणि अनेकांच्या मनात स्वप्नपूर्तीची भावना आहे.अयोध्येचा होऊ घातलेला कायापालट अन्यत्रही अशा मंदिर उभारणीच्या रेट्यास गती देईल.. पण केवळ धर्मकेंद्र असणे हे सर्वांगीण प्रगतीसाठी पुरेसे असते ?आज २२ जानेवारीस अयोध्येत श्रीराम मंदिराचा उद्घाटन सोहळा. यानिमित्ताने एकंदरच सर्वत्र हिंदू सश्रद्धांच्या आनंदास उधाण आलेले आहे आणि अनेकांच्या मनात स्वप्नपूर्तीची भावना आहे. या स्वप्नपूर्तीच्या श्रेयाचे मानकरी या नात्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याही मनात कृतकृत्यतेची भावना दाटून आली असणार. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यामुळे भाजपची तीन प्रमुख स्वप्ने होती. जम्मू-काश्मिरातून अनुच्छेद ३७० चे उच्चाटन, राम मंदिराची उभारणी आणि समान नागरी कायदा. यातील पहिल्या दोनांची पूर्तता मोदी यांच्या हस्ते झाली आणि तिसऱ्यासही ते निर्विवाद हात घालतील. संघाच्या आणि म्हणून भाजपच्याही विरोधकांस हे सगळे व्यर्थ, निरुपयोगी आणि भावना उद्दीपित करणारे वाटू शकेल. त्यांनी तसे वाटून घेण्यात अगदीच तथ्य नाही असे नाही. तथापि देशातील बहुसंख्यांना आपल्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष होते असे वाटत असेल आणि त्या वाटण्यास खतपाणी घालणारी परिस्थिती निर्माण होत असेल तर यातही तथ्य नाही असे म्हणता येणार नाही. धर्म ही संकल्पना व्यक्तिसापेक्ष असते आणि ती त्या त्या व्यक्तीने स्वतःच्या घराच्या उंबरठ्याबाहेर आणू नये हे आदर्श तत्त्व. तथापि काही धर्मीयांबाबत- आणि त्यातही विशेषतः इस्लाम- या आदर्श तत्त्वास सोयीस्कर तिलांजली दिली जाते असे बहुसंख्य हिंदू धर्मीयांस वाटू लागले असेल आणि त्यातून त्यांच्या धर्मभावना अधिक चेतवल्या गेल्या असतील तर ते का, कसे आणि कोणामुळे झाले याचाही विचार यानिमित्ताने केला जाणे आवश्यक ठरेल. समाजकारणात सर्वधर्मसमभाव/ निधर्मिकता अत्यावश्यक याबाबत तिळमात्रही संदेह नाही. तथापि जॉर्ज ऑर्वेलच्या 'अ ?निमल फार्म'मध्ये ज्याप्रमाणे कायद्यासमोर सर्व समान असले तरी काही अधिक समान असतात हे सत्य धर्माबाबतही दिसून येत असेल तर कालांतराने त्या धर्मीयांच्या भावनेचा प्रस्फोट होतो. तसा तो आपल्याकडे झाला आणि त्यातून भाजप अधिकाधिक सुदृढ होत गेला. त्या सुदृढतेच्या भावनेचे प्रतीक म्हणजे आज उद्घाटन झालेले अयोध्येतील राम मंदिर.राम-कृष्ण-शिव या त्रिकुटाचे गारूड भारतीय मनावर किती व्यापक आहे हे उलगडून दाखवणारा राममनोहर लोहिया यांचा लेख 'लोकसत्ता'ने रविवारी पुनर्प्रकाशित केला. लोहिया हे समाजवादी विचारधारेचे. तरीही राम-कृष्णाचे सांस्कृतिक महत्त्व मान्य करण्याच्या आड त्यांची विचारधारा आली नाही. याचे कारण राम-कृष्ण-शिव आदी ही भारताची सांस्कृतिक प्रतीके आहेत हे त्यांना मान्य होते आणि सांस्कृतिक प्रतीकांस राजकारणात ओढण्याची गरज नसते हा समंजसपणा सर्वमान्य होता त्या काळात ते राजकारणात होते. तो नंतर लोपला. पुढे मूळच्या काँग्रेसवासी असलेल्या हिंदू (हिंदुत्ववादी नव्हे) नेत्यांस स्वतःची वेगळी चूल मांडण्याची गरज वाटली. अशी हिंदू गरज ही नेहमी प्रतिक्रियारूपी आहे, हे सत्य यानिमित्ताने लक्षात घ्यायला हवे. म्हणजे आधी 'मुस्लीम लीग'ची स्थापना झाली. हिंदू महासभा आणि रा. स्व. संघ हे नंतर आले. हिंदू महासभा ही 'मुस्लीम लीग' निर्मितीची पहिली प्रतिक्रिया. पुढे ही महासभाही पुरेशी हिंदू नाही असे वाटल्याने रा. स्व. संघ तयार झाला. मुसलमानांच्या क्रियेवर हिंदूंची प्रतिक्रिया उमटण्याचा इतिहास आजतागायत तसाच सुरू आहे. यावर 'ते' तसे वागले म्हणून 'आपण' असे वागावे का, असा प्रश्न उपस्थित होतो. तो योग्यच. पण या प्रश्नाचे उत्तर नाही देण्यास आवश्यक बौद्धिक उंचीवर बहुसंख्य सामान्य कदाचित पोहोचू शकत नसावेत. अशा सर्वांस 'विजय' दृश्य स्वरूपात असावा लागतो. याचे साधे कारण म्हणजे भक्ती नवविधा असल्याचे हिंदू धर्मच सांगत असला तरी बहुसंख्यांची हयात प्रतीक-पूजेच्या पहिल्या विधी-पायरीवरच संपते. त्यांच्यासाठी अशी प्रतीके आणि त्या प्रतीकांचा 'विजय', त्यांची 'भव्यता' सुखावणारी असते. 'उसकी कमीज मेरी कमीज से सफेद कैसे' ही भावना धर्मक्षेत्रातही असते हे विसरून चालणार नाही.हे असे हिंदू धर्माच्या तात्त्विक, बौद्धिक विशालतेशी अवगत नसतात. त्यांस ही विशालता कधीही स्पर्शणार नसते. वेदपुराणांच्या गौरवगानात मग्न असलेले भारतीयसुद्धा दार्शनिकतेविषयी, त्यातील प्रश्न विचारण्याच्या महत्तेविषयी अनभिज्ञ असू शकतात. ''हे सर्व निर्माण व्हायच्या आधी काय होते या प्रश्नाचे उत्तर विधात्यासच ठाऊक असेल..'' असे सांगणारा ऋग्वेद त्याच ओळीत ''..कदाचित त्यालाही हे माहीत नसेल'', असे म्हणण्यास मागेपुढे पाहात नाही. हिंदू धर्मात अश्रद्धांचाही श्रद्धावानांइतकाच आदर केला जातो आणि नास्तिकासही आस्तिकासारखेच वंदन केले जाते हे या सर्वांस माहीतही नसते. त्याच वेळी आपल्या उपेक्षांसाठी परदेशांतून आलेल्या धर्मीयांस- म्हणजे ख्रिश्चन आणि मुसलमानांस- बोल लावताना हिंदू धर्म इतका सर्वसमावेशक होता तरी जैन, बौद्ध वा शीख धर्म या मातीत तयार का झाले हे प्रश्न यांतील अनेकांस पडत नाहीत. खुद्द हिंदू धर्मातील अनेकांवर धर्मत्यागाची वेळ का आली हा प्रश्नही यांतील अनेकांस भेडसावत नाही. अयोध्येत आज राम मंदिराचे उद्घाटन झाल्यानंतर अथवा काशी-मथुरा वा सोमनाथ येथेही अशी भव्य मंदिरे उभारली गेल्यानंतर कदाचित या सगळ्याची जाणीव होऊ शकेल. या मंदिर निर्मितीमुळे अयोध्येचा होऊ घातलेला कायापालट अन्यत्रही अशा मंदिर उभारणीच्या रेटयास गती देईल.यानिमित्ताने धार्मिक पर्यटनाचे महत्त्व सांगितले जात आहे. ते खरे आहे. संस्कृतीचा विकास धर्मक्षेत्रांभोवती झाला आणि ही धर्मकेंद्रे आर्थिक विकासाची गंगोत्रीही बनली हे खरेच. पण हेही खरे की केवळ धर्मकेंद्र आहे हे निमित्त सर्वांगीण प्रगतीसाठी पुरेसे नसते. तसे असते तर मक्का-मदिना ही इस्लामची पवित्र धर्मकेंद्रे सौदी अरेबियास आर्थिक महासत्ता बनवू शकली असती. व्हॅटिकन आणि पोपचे वास्तव्य आहे या केवळ एकाच कारणासाठी इटली इतिहासात महासत्तापदी पोहोचली नाही. धर्मकेंद्रांभोवती धार्मिक सलोख्याचे आणि खऱ्या अर्थी सर्वधर्मसमभावाचे वातावरण सर्वंकष प्रगतीसाठी आवश्यक असते. तसे नसेल तर धर्मकेंद्र हे केवळ त्या त्या धर्मीयांसाठी श्रद्धास्थान इतक्यापुरतेच मर्यादित राहते. रोम आणि मक्का-मदिना यांतील फरक हे सत्य दाखवतो. हॉटेले, बँका, वित्त सेवा, पर्यटन व्यावसायिक यांच्यात सध्या अयोध्यावासी होण्यासाठी दिसून येत असलेली लगबग कौतुकास्पद खरीच. पण तीस धार्मिक सौहार्द, उत्तम पायाभूत सोयी आणि त्याहीपेक्षा सुसंस्कृत वातावरण याचीही जोड मिळत राहील याची दक्षता धोरणकर्त्यांस घ्यावी लागेल. मंदिराच्या उद्घाटनाचा आनंदसोहळा शांत झाला, त्यामागील राजकीय निकड निवली की या मुद्दयांकडेही लक्ष देण्यास संबंधितांस उसंत मिळेल.संस्कृतीच्या अनादी-अनंत प्रवासात एखादी वास्तू उभारणी हा एक टप्पा. असा एखादा टप्पा म्हणजे गन्तव्य स्थान नव्हे. हिंदू श्रद्धावानांसाठी मंदिर उभारणी हा असा एक अर्थातच 'विजयी' टप्पा. कोणत्याही विजयाचे आयुष्य आणि गोडवा हे त्यानंतर दिसणाऱ्या उन्मादावर नव्हे तर नम्रतेवर अवलंबून असते. या संदर्भात खुद्द श्रीरामाचे तुलसीरामायणातील वचन उद्धृत करणे प्रसंगोचित ठरेल. प्रभू रामचंद्र जेव्हा विजयी होऊन अयोध्येत सिंहासनावर विराजमान झाले तेव्हा अयोध्यावासीयांस उद्देशून म्हणाले : जौ अनीति कछु भाषौ भाई। तौ मोहि बरजहु भय बिसराई।। सत्तापदी आरूढ झाल्यावर माझ्याकडून अनीतीचे वर्तन/वक्तव्य झाल्यास निर्भयपणे मला विरोध करा, हे खुद्द श्रीरामाचे आवाहन. आजच्या मुहूर्तावर ते लक्षात घेणे महत्त्वाचे.

भारतवर्षात कोणते नाव दुमदुमले!

शहाजी राजे भोसले पुण्यस्मृती विशेष...



शहाजीराजे भोसले हे छ.शिवाजी राजे भोसले यांचे वडील आणि मालोजी राजे भोसले यांचे ज्येष्ठ पुत्र होते. ते पराक्रम, युद्धप्रसंगीची बुद्धिमत्ता, उत्तम प्रशासन व स्वतंत्र राज्यकारभार हे मूलभूत गुण-कौशल्य असलेले ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपल्या कारकीर्दित निजाम, मुघल आणि आदिल सत्तेत सरदार म्हणून राहिले, तरी त्यांची महत्त्वाकांक्षा स्वतंत्र राज्य स्थापनेची होती. त्यांनी तसा दोनदा प्रयत्न केला, परंतु त्यास फारसे यश आले नाही. त्यांचे स्वप्न त्यांचे पुत्र छ.शिवाजी राजे महाराष्ट्र आणि व्यंकोजी राजे तंजावर यानी प्रत्यक्षात आणले. ही ज्ञानवर्धक माहिती श्री एन. के. कुमार गुरुजी यांच्या भारदस्त शब्दांत जरुर वाचा... संपादक.

मालोजी भोसले यांची पत्नी दीपाबाई- उमाबाई हिच्या पोटी सिंदखेड येथे शहाजींचा जन्म दि.१५ मार्च १५९४ रोजी झाला. शहाजी राजेंच्या जन्मतारखेबद्दल इतिहासकारांत नेहमीप्रमाणे मतभेद आहेत. बाबाजी राजे भोसले यांच्या घरात मालोजी राजे भोसले आणि उमाबाई भोसले यांच्या पोटी शहाजी राजे यांचा जन्म झाला. त्यांच्या जन्माच्या वेळी त्यांच्या मातोश्री उमाबाईंनी अहमदनगरजवळील शहाशरीफ पीराला अहमदनगर जवळील मुकुंदनगर भागात तारकपूर बस स्टँडपाशी नवस बोलल्यामुळे त्यांनी आपल्या दोन्ही मुलांची नावे शहाजी व शरीफजी अशी ठेवली. पुढे सिंदखेडराजा येथील लखुजीराव जाधव यांच्या मुलीशी म्हणजेच जिजाबाईंशी शहाजीराजे यांचा डिसेंबर इ.स. १६०५मध्ये विवाह झाला. या वेळी लखुजीराव व मालोजीराजे हे दोघेही निजामशाहीत होते. पुढे लगेचच मालोजी राजेंचा दुर्दैवी मृत्यू झाला. कालांतराने जसेजसे शहाजी राजे मोठे होत गेले, तसतशी पराक्रम, राजकारण, मुत्सद्देगिरी या बाबतीत त्यांची कीर्ती वाढत सर्वदूर सुगंधासारखी पसरत गेली. मालोजी राजे भोसले हे आपला भाऊ विठोजी राजे भोसले यांचेसह सहकुटुंब सन १५७७मध्ये सिंदखेड येथे लाखुजीराजे जाधव यांच्याकडे नोकरीस आले होते. तद्नंतर शहाजींचे पिता मालोजी राजे यांनी लखुजीराजे जाधव यांची नोकरी सोडून इ.स.१५९९ साली अहमदनगरच्या निजामाची नोकरी मिळवली.

मुघल शहेनशाह औरंगजेब याने इ.स.१६२४ लष्कर खानला १.२ लाख सैन्यासह रवाना केले. सोबत आदिलशहा ८० हजार सैन्य घेऊन निघाला. शहाजी राजेंकडे २० हजार सैन्य होते. त्यातील १० हजार अहमदनगरच्या रक्षणासाठी ठेवून

तेवढेच त्यांनी स्वतःकडे ठेवले. एवढ्या मोठ्या सैन्याला प्रचंड पाणी लागेल म्हणून मुघल आणि आदिलशाही सैन्याने उत्तर-दक्षिण वाहणाऱ्या मेखरी नदीजवळ भातवडी येथे छावणी उभी केली. एरवी दुष्काळग्रस्त असलेल्या अहमदनगरला तेव्हा चांगला पाऊस झाला होता. शहाजी राजेंनी छावणीच्या उत्तरेस धरणाला असे तडे पाडले, की रात्री झोपलेल्या मुघल आणि आदिलशाही छावणीची काही कळण्यापूर्वीच वाताहात झाली. तेव्हा अनेक योद्धे शहाजी राजेंचे बंदी झाले आणि त्यांचे नाव भारतवर्षात दुमदुमले. याच लढाईत त्यांचे बंधू शरीफजी धारातीर्थी पडले. भातवडी हे गाव अहमदनगरपासून पंधरा किमी अंतरावर आहे. नंतर निजामशाही वजीर, फतेह खान, जहान खान यांनी निजामाला मारले आणि राजांना निजामशाहीसाठी मिळवले. शहाजहानने दरम्यान निजामशाहीतील सगळ्या पुरुषांना ठार करविले. उद्देश असा की निजामशहीला वारस रहाणार नाही. तेव्हा राजांनी निजामाच्या नात्यातील छोट्या मुर्तझाला गादीवर बसवून स्वतः कारभार हाती घेतला, जणू स्वतःवरच छत्र धारण केले. ही घटना अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील पेमगिरी किल्ल्यावर घडली. त्यांचा हा स्वतंत्र राज्यकारभार जवळजवळ तीन वर्षे टिकला होता. त्यानी मुर्तझाच्या आईला त्याच्या सुरक्षिततेची हमी दिली.

दिल्लीचा बादशहा शहाजहानने ४८ हजार सैन्य निजामशाही व आदिलशाही संपवण्यासाठी पाठवले; तेव्हा घाबरून आदिलशहा हा शहाजहानला मिळाला. शहाजी व निजामशाहीचा टिकाव लागणे शक्य नव्हते, तरीही शहाजीने नेटाने लढा चालू ठेवला. दरम्यान छोटा मुर्तझा शहाजहानच्या हाती लागला. तेव्हा त्याच्या सुरक्षिततेसाठी आणि त्याच्या आईला दिलेल्या शब्दासाठी त्यांनी शहाजहानशी तह केला. या तहांतर्गत मुर्तझा शहाजहानकडे सुरक्षित राहील आणि शहाजी आदिलशाहीला मिळेल. शहाजहानने सावधगिरी म्हणून शहाजीराजांना दक्षिणेला बंगळूरची जहागिरी दिली. बेंगलोर विजयनगर साम्राज्य जे एक जहागिरदार, केम्पे गौडा १ यांचेद्वारे सन १५३७मध्ये स्थापित केले गेले होते, त्यांनी विजयनगर साम्राज्यामधून स्वातंत्र्याची घोषणा केली होती, त्याला सन १६३८मध्ये त्यांचा उपसेनापती, शाहजी भोसले यांच्यासोबत रानादुल्ला खान यांच्या नेतृत्वाखाली एक बड़ी आदिलशाही बीजापुर सेनाद्वारे बेंगलोरवर कब्जा केला गेला होता, ज्यांनी केम्पे गौडा ३ यांना पराजित केले होते आणि बेंगलोरचे शाहजी यांना जहागिर- संपत्तीच्या स्वरूपात बहाल केली ?गेली ? होती. आदिलशाहीत असताना शहाजीराजांनी पुणे परगणा निजामशाहीकडून काबीज केला होता, तोही त्यांच्याकडेच ठेवला.

शहाजीराजांना बंगळूरचा प्रदेश फार आवडला. शहाजीराजे व त्यांचे थोरले चिरंजीव संभाजी राजे यांनी आपल्या मनातील स्वराज्य संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचे या ठिकाणी ठरविले. शहाजी मुळातच उत्तम प्रशासक व पराक्रमी योद्धे होते. त्यांनी दक्षिणेतील राजांवर विजय मिळवून दक्षिणेला आदिलशहीचा विस्तार केला. पण हे करताना त्या हरलेल्या राजाना शिक्षा किंवा देहदंड न करता त्यांना मांडलिक केले. त्यामुळे गरज पडली तेव्हा हे राजे शहाजींच्या मदतीला आले. राजांनी आपले पुत्र छ.शिवाजी महाराजांना पुण्यात आपल्या जहागिरीवर स्वतंत्र कारभार चालविण्यासाठी पाठवून स्वराज्य स्थापनेसाठी बरीच अनुकूल परिस्थिती निर्माण करून दिली. छ.शिवाजी राजांबरोबर बाजी पासलकर, रघुनाथ बल्लाळ अत्रे, कान्होजी जेधे नाईक व सातारचे शिंदे देशमुख हेही पुण्यात आले. राज्य कारभारासाठीची आवश्यक राजमुद्राही शहाजी राजांनीच शिवरायांना दिली. छ.शिवरायांच्या वाढत्या कारवायांना पायबंद घालण्यासाठी आणि शहाजी राजांची यांस फूस आहे, या संशयाने आदिलशाहीने मुख्य वजीर नवाब मुस्तफाखान याने बाजी घोरपडे, मंबाजी भोसले, बाजी पवार, बाळाजी हैबतराव, फतेहखान, आझमखान यांच्या साहाय्याने शहाजी राजांना दगा देऊन कर्नाटकातील जिंजीजवळ कैद केले. साखळदंडांनी बांधून भर विजापुरातून शहाजीराजांना दरबारात हजर करण्यात आले. तो दिवस होता दि.२५ जुलै १६४८चा. हे कळताच छ.शिवाजी महाराजांनी मुत्सद्दीपणाने राजकारण करत दिल्लीत मोगल सुलतान शहाजहानला एक पत्र पाठवले. स्वतः आपण व आपले पिता शहाजी राजे हे दिल्लीपतीची चाकरी करू इच्छितात, असे त्यांनी लिहिले. या बदल्यात शहाजीराजांची विजापूरच्या कैदेतून मुक्तता करावी, ही अट घातली. अशा प्रकारे छ.शिवाजी महाराजांनी शहाजीराजांच्या सुटकेसाठी दिल्लीच्या बादशहाला मधाचे बोट लावले, हा प्रयत्न यशस्वी ठरला. शहाजीराजांची दि.१६ मे १६४९ रोजी सन्मानपूर्वक सुटका झाली. अफझलखान स्वराज्यावर चालून आला तेव्हा अफझलखानाची दगाबाजी माहिती असल्याने शहाजीराजेंनी १७ हजार फौज विजापूरबाहेर खडी ठेवली होती.

शहाजीराजांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला असता असे लक्षात येते, की त्यांनी स्वाभिमान राखत आदिलशाही, मुघलशाही व निजामशाही या सर्व सत्ताधीशांकडे काम केले. त्यांच्या कारकिर्दीचे महत्त्वाचे टप्पे असे- सन १६२५ ते १६२८- आदिलशाही, सन १६२८ ते १६२९- निजामशाही, सन १६३० ते १६३३- मुघलशाही, सन १६३३ ते १६३६- निजामशाही, सन १६३६ ते १६६४- आदिलशाही पुढे सन १६६१ ते १६६२ दरम्यान शहाजीराजे महाराष्ट्रात आले होते. त्यांनी त्यानंतरचा काही काळ छ. शिवाजीराजे व जिजाबाईंसमवेत घालवला. आपण लावलेल्या स्वराज्याच्या रोपट्याचा आज विशाल वटवृक्ष झाल्याचे पाहून ते धन्य झाले. काही काळानंतर ते पुन्हा आपल्या जहागिरीत परतले. माघ शुद्ध ५, म्हणजेच दि.२३ जानेवारी १६६४ रोजी होदेगिरीच्या जंगलात शिकारीला गेले असताना त्यांच्या घोड्याचा एका वृक्षवेलीमध्ये पाय अडकला व ते खाली कोसळले आणि त्यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ व्यंकोजीराजांनी राजपरंपरेप्रमाणे शहाजीराजांची उत्तरक्रिया केली व समाधी शिमोग्याजवळ होदेगिरी जिल्हा दावणगिरी- कर्नाटक येथे बांधली.

!! शहाजी राजेंना त्यांच्या पुण्यस्मरणदिनी विनम्र अभिवादन !!

श्री एन. के. कुमार गुरुजी.
गडचिरोली, मोबा- ७७७५०४१०८६.

सेनानी...

बाळासाहेब
आपले
धीर गंभीर तो ध्वनी
वक्तृत्व अंबाई देन
अजूनि रूंजी कानी

आपण नाहीत तरी
प्रतिमा उत्कट मनी
हिंदुत्वाचा यागजाग
सतत पेटलेली धुनी

आगळीचं पडे छाप
ती मराठीअभिमानी
चौकस अक्ष चाणाक्ष
स्वभाव अष्टावधानी

सत्तेची कुठे लालसा
विरक्त वैराग्य मूनी
वृत्ती मार्मिककार्मीक
कलात्मकता ठासूनी

वारसा पत्रकारितेचा
प्रबोधनकारां पासूनि
कोपरखळी चपलख
सहज मारती हसूनि

छत्रपती आशीष तव
लाभले भर भरूनि
जाणवे कृपा आपली
इतुके अंतर असूनि

- हेमंत मुसरीफ पुणे .
९७३०३०६९९६

सेनाप्रमुख सभा...

गाजली
नाही कुठली
बाळासाहेबांची
सभा
तिष्ठेश्रोता जागोजाग
कानाकोप-यात उभा

उभे राही सेना प्रमुख
टाळ्या पोचती नभा
ते हवे कशाला भोंगे
दणका देतीलं जिभा

अर्थपूर्ण वाक्य हरेक
शब्दांची खास आभा
बंधने नसे साहेबांना
दशदिशा देतात मुभा

रे दर्दी श्रोत्यांची गर्दी
ही सोन संधी रे बाबा
कायदे पडू दे आडवे
कितीदा मुस्कटदाबा

ते दिशादर्शक वक्तृत्व
जाणा आशय गाभा
आता फक्त आठवणी
बाळासाहेबांची सभा

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

भुगांव येथे आमदंगल,मंडई,शंकरपट कार्यक्रम संपन्न

कामठी ■ नंदू कोल्हे



भुगांवः- कामठी तालुक्यातील भुगांव या गावात पिडो न पिढी चालत आलेली परंपरा म्हणजे मकर संक्रांत निमीत्य शंकरपट,आमदंगल,मंडई चे कार्यक्रम या वर्षी सुद्धा फार मोठ्या उत्साहात पार पडले.या कार्यक्रमा निमित्य प्रत्येक घरोघरी पाहुणे मंडळी,सगे सोयरे येतात.नवीन नाती गोती वर वधु पाहण्याचे कार्यक्रम होतात.त्या मुळे मकर संक्रांत निमीत्य २०,२१ जानेवारी ला दोन दिवस कार्यक्रम होतात.याचे नियोजन ग्रामपंचायत चे सरपंच, सदस्य,गावातील पंच कमिटी करतात.आलेले पाहुणे ,नागरिक यांच्या मनोरंजनासाठी ढीवर मोहल्ला, पुरुषोत्तम हजारे नगरसेवक पारडी यांच्या तर्फे बाजार चौक, मारवड्याचा वड,खात्याचा वड,इत्यादी ठिकाणी विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.शंकरपट हे विठ्ठल साखरकर नान्हा पांधन या परिसरात भरविण्यात आले होते.कोणत्याही कार्यक्रमात दंगा फसाद झालेला नसून शांततेत पार पडला. आमदंगल चे प्रथम बक्षीस रोशन डहाके,द्वितीय बक्षीस रितेश ढोबडे,तृतीय बक्षीस विठ्ठल खेडकर या मोठ्या कुस्ती वर ठेवण्यात आलेला होता.बाहेर गावचे कुस्तीपटू फार मोठ्या संख्येने आलेले होते.आम दंगल पाहण्यासाठी जवळपास पाच हजार लोकांनी हजेरी लावलेली असल्याचे दिसून आले. दिगांबर आंबीलडुके, देवचंद बालपांडे यांनी रेफरी म्हणून काम पाहिले आणि सुरेश आंबीलडुके,कैलास खेडकर यांनी शंकर पटात सिंगल मास्टर ची जवाबदारी पाहिली.या प्रसंगी उपसभापती दिलीप वंजारी, रामकृष्ण वंजारी,भुगाव चे सरपंच नितेश घुबडे, उपसरपंच फुलचंद आंबीलडुके,संजय गायधने,जितेंद्र मेहरकुळे,पुंडलिक खेडकर,दर्शन कुंभले,सुखदेव वंजारी,माजी सैनिक सुदाम घारपिंडे,पो.पा.लुखराम आंबीलडुके,भाजप अध्यक्ष ज्ञानेश्वर वैद्य,टीकाराम गायधने,अर्जुन राऊत,रामगोपाल ढोबळे रोजगार सेवक,धीरज चव्हाण ऑपरेटर,ओमप्रकाश मेहर पाणी पुरवठा कर्मचारी,आकाश वैद्य,शरद ढोबळे व बहुसंख्येने पाहुणे मंडळी,पहिलवान बंधू,नागरिक उपस्थित होते.सामूहिक राष्ट्रगीत सादर करून कार्यक्रमाची समाप्ती करण्यात आली.

वर्धा जिल्ह्यातील तक्रारी घेतल्या भटके विमुक्त तक्रार समितीने



वर्धा ■ नंदू कोल्हे

दिनांक २१ जानेवारी २०२४ ला समाजकल्याण विभागाच्या महिला आश्रम परिसरातील सामाजिक न्याय हॉल मध्ये वर्धा जिल्ह्यातील भटके विमुक्त जमातीच्या तक्रारी घेण्यासाठी मिटींग चे आयोजन केले होते. यात समितीचे सदस्य मुकुंद अडेवार , व प्रकाश बमनोटे उपस्थित होते त्यांनी त्यावेळेस आलेल्या सर्व समाजाचे प्रश्न एकूण घेतले , व त्यांच्या लेखी तक्रारी ही घेतल्या. मदारी, बेलदार, धनगर, वंजारी,गाडी लोहार,भोई,गवळी,ओतारी, वडार, सरोदे,समाजाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते, कॉंग्रेस पक्षाच्या भटकेविमुक्त सेलचे वर्धा अध्यक्ष सौ. सोनाली कोपुलवार, भारतीय जनता पक्षाचे भटकेविमुक्त आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष किशोर सायगण,भारतीय जनता पार्टी वर्धा मच्छीमार सेलचे अध्यक्ष पंकज बावणे, कॉमिनिस्ट पक्षाच्या द्वारकाताई इमडवार, नूतनताई माळवी,भटके विमुक्त प्रतिनिधी म्हणून उपस्थित होत्या. बेलदार समाजाचे प्रश्न अनिल चव्हाण विजय कोपुलवार यांनी मांडले,सय्यद शबिर , अनवर पठाण यांनी मदारी समाजाचा समस्यां मांडल्या तर , सोनाली कोपुलवार यांनी वर्धा जिल्ह्यातील सर्व भटक्या विमुक्त जमातीचे प्रश्न मांडले त्यांनी वडार, नाथजोगी,भराडी,पारधी, मदारी समाजाचे प्रश्न मांडले,राजेंद्र कळसाईत विध्याताई कळसाईत, यांनी सर्व जातीचे प्रश्नाची मूळ सुटण्यासाठी जातीचे प्रमाणपत्र देणे अतिशय आवशक्य असल्याचे प्रखर मत त्यांनी ठेवले,अंकुश चव्हाण याने गाडीलोहार समाजाचे प्रश्न , विद्यार्थीचे प्रश्न मांडले,गणेश खंडाळे यांनी ओतारी समाजाचे प्रश्न मांडले, वर्षा मोहीजे हिने भोई ढिवर समाजाचे प्रश्न मांडले,श्री उपासे साहेब यांनी धनगर समाजाचे प्रश्न मोठ्या ताकतीने व्यासपीठावर मांडले, किशोर सायगण यांनी महाज्योति, स्वधार योजना याविषयावर माहिती सांगितली, एकत्रितपणे मिटींग अतिशय महत्वाच्या विषयावर झाली , प्रश्न आणि उकल कशी करावी यावरही चर्चा झाली, हे सर्व निवेदन आणि तक्रारीचा अहवाल लवकरच माननिय जिल्हाधिकारी साहेब, विभागीय आयुक्त साहेब यांना देऊन लवकरचं संपूर्ण तक्रार निवारण समितीची संयुक्त बैठक घेऊन कामाचा आढावा घ्यावा असे माननिय जिल्हाधिकारी साहेब यांना सांगून लगेच मिटींग घेतल्या जाईल असे ही ठरले.ही मिटींग करण्यासाठी समाजकल्याण उपा आयुक्त वर्धा माननीय कुलकर्णी साहेब यांनी विशेष सहकार्य दिले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले गडमंदिर येथे श्रीरामाचे दर्शन

रामटेक ■ जयश्री मेंघरे



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथील प्रसिद्ध व प्राचीन गड मंदिरात प्रभू श्रीरामाची आरती, पूजन केले व दर्शन घेतले. शहरात सुरू असलेला महासंस्कृती महोत्सव आणि अयोध्येत होत असलेल्या रामलल्ला प्राण प्रतिष्ठेच्या पार्श्वभूमीवर गड मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली. जिल्ह्यातील तरुण, महिला,अबाल-वृद्ध मोठ्या संख्येने गडावर आले होते. हातात भगवे झेंडे आणि मुखी जय श्रीरामच्या जय घोषाणे वातावरण निनादून गेले होते.

अशा भक्तीमय व उत्साहाच्या वातावरणात फडणवीस यांनी सायंकाळी गडावर प्रवेश केला. मंदिराच्या प्रवेशद्वारा शेजारील पटांगणात आयोजित आरतीत त्यांनी सहभाग घेतला. मंदिरात विराजित प्रभू श्रीरामाच्या मूर्तीचे पूजन करून त्यांनी आशीर्वाद घेतला. यावेळी रामटेकचे खासदार कृपाल तुमाने,आमदार ॲड.आशिष जयस्वाल, माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी, विशेष पोलीस महानिरीक्षक छेरींग दोरजे, ग्रामीण पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार आदी उपस्थित होते. रामटेकच्या उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते यांनी फडणवीस यांचे मंदिर समितीच्यावतीने शाल व श्रीफळ देवून स्वागत केले.

सामाजीक चळवळीतील कार्यकर्त्यांचा सन्मान व्हावा -डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी

दै, जनप्रभात अहमदपूरचे तालुका प्रतिनिधी ■ सचिन नागनाथ बानाटे



अहमदपूर : के का,र्यकर्ता घडण्यासाठी आयुष्यातील किमान पंचविस वर्ष खर्च करावे लागतात तेंव्हा कूठे एक सजग कार्यकर्त्याचा जन्म होतो.समाजातील सर्वच प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी कूठलाही कार्यकर्ता हा आग्रही भूमिका घेत असतो तेंव्हा सामाजिक क्षेत्रात बरोबर विविध क्षेत्रात काम करणाऱ्या अशा कार्यकर्त्यांचा समाजाने सन्मान करावा अशी अपेक्षा युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी व्यक्त केली.

येथील विश्रामगृह येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते गोपीनाथराव जोंधळे यांच्या अभिष्टचिंतन कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.अध्यक्षस्थानी माजी आमदार रामभाऊ गूंडीले हे होते.या प्रसंगी पूढे बोलताना डॉ.सिध्दार्थकूमार सूर्यवंशी म्हणाले की,ज्या प्रमाणे एखाद्या बिया पासून अंकुर फूटून नवे झाड तयार होते त्याच प्रमाणे एक कार्यकर्ता घडत असतो.परंतू एखादा कार्यकर्ता पूढे जावू पहात असेल तर सर्व समाज घटकांनी त्याला प्रोत्साहित करून पूढे पाठविले पाहीजे मात्र प्रस्थापीत व्यवस्थेच्या विचारांची माणसं वृक्षरूपी कार्यकर्त्यांचा अंकुर खूडण्याचे पाप करीत आहेत.ही बाब चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी पर्याय़ाने चळवळीसाठी घातक आहे.कार्यकर्ता हा गूण दोषासहित स्वीकारून त्याच्यातील चांगल्या गोष्टीचा पूरस्कार करत समाजव्यवस्थेच्यासाठी,प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी त्याचा वापर करून घेणे गरजेचे आहे अशी भूमिका मांडली.तसेच कार्यकर्ता म्हटला की,तो कामासाठी सज्ज असला पाहिजे फक्त नावापुरताच कार्यकर्ता असने हे सूध्दा चुकीचे असल्याचे प्रतिपादन केले.

या प्रसंगी सत्कारमूर्ती गोपीनाथराव जोंधळे,शिक्षक संघटनेचे विभागीय अध्यक्ष बाबासाहेब वाघमारे,रिपाई नेते अरूणभाऊ वाघंबर,पोलिस उपनिरीक्षक प्रभाकर अंधोरीकर, माजी नगराध्यक्ष सरस्वतीबाई कांबळे,संतोष गायकवाड,पत्रकार शिवाजीराव गायकवाड,भिमराव कांबळे,प्रभाकर गायकवाड चिखलीकर आदींनी मनोगत व्यक्त केली.माजी आमदार रामभाऊ गूंडीले यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना म्हटले की,सर्वच कार्यकर्त्यांसाठी आजचा काळ अतिशय कठीण असून आपल्यातील एकी हीच महत्वाची बाब आहे.आपापल्या मधे स्पर्धा जरूर असावी मात्र सूप्त संघर्ष असता कामा नये.सूप्त संघर्ष हेच आपल्या अधोगतीचे कारण ठरू शकते असे प्रतिपादन केले.

सत्कारमूर्ती गोपीनाथराव जोंधळे म्हणाले की,आंबेडकरी चळवळ मी प्रामाणिक पणे काम करत आलो आहे.मताच्या पेटीतून मी नेता म्हणून पूढे आलो आहे.त्यामुळेच तालूकास्तरावर सक्रीय पणे कार्यरत आहे.भविष्यात याच्या पेक्षा अधिक गतीने काम करून चळवळीतील कूठल्याही कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे थांबण्याची आपली भूमीका आहे.तालुक्याला दिशादर्शक चळवळ असावी यासाठी आपला पूढाकार असणार आहे अशी माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब वाघमारे गुरूजी यांनी केले तर आभार रिपाई नेते अरूणभाऊ वाघंबर यांनी मानले.या प्रसंगी सचिन बानाटे, डॉ.बालाजी थिट्टे, बजरंग गायकवाड,माधव बनसोडे, बालाजी बनसोडे,पत्रकार गणेश मूंडे, मनोहर गायकवाड, धम्मानंद कांबळे,संतोष गायकवाड, बालाजी थिट्टे, माधव बनसोडे, गौतम बनसोडे, कलीमभाई अहमद, मिलिंद कांबळे, माधवराव रायभोळे आदींची उपस्थित होते.

तारळे विभागीय युवा नेते राहूल रोकडे यांचा जाहीर सत्कार

सातारा ■ जीवन मोहिते



तारळे विभागीय युवा नेते राहूल रोकडे यांचा भव्य सत्कार राहुडे,ता.पाटण येथे करण्यात आला.तेव्हाभानुदास सावंत नामदेवराव साळुंखे विजयकुमार कदम खरात सर प्रकाश काशिळकर सुहास माने जयवंत लोखडे आत्माराम कांबळे दशरथ कांबळे मिलिद कांबळे बबन शिंदे सदाभाऊ जाधव रेखाताई जाधव कार्यक्रम चे अध्यक्ष राजाराम भंडारे मार्गदर्शन केले.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी गौरवशाली मनोगत व्यक्त केली. तारळे भागाचे दमदार युवा नेतृत्व,बौद्ध विकास सेवा संस्थेचे अध्यक्ष राहुल सुदाम रोकडे यांना छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार मिळाल्याने भारतीय बौद्ध महासभा तारळे विभाग व बौद्ध विकास सेवा संस्था,तारळे यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सत्कार सोहळ्यास सर्व पदाधिकारी, युवा मित्रमंडळी, सर्व धम्म बंधु-भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

सदरच्या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष मिलिंद कांबळे (पाटण), आबासाहेब दणाने(सातारा), नंदकुमार भोळे,रुपेश सावंत,श्री व सौ.मिलिंद (बापू) कांबळे,सर्व तोफिक डगरे प्रशांच चव्हान उप सरपंच श्रीकांत सोनवले शिवाजी जाधव सोमनाथ खरात भिमराव सपकाळ जिवन मोहीते आनिल विर आनंदा मनोज भंडारे मधुकर जधनी कांबळे ,बौद्धाचार्य, रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष विशाल भोसले, राष्ट्रोत्सव संयोजन समितीचे उपाध्यक्ष ?ड. विलास वहागावकर,आरपीआय पाश्चिम महाराष्ट्र सचिव प्रा.रवींद्र सोनवले,तालुकाध्यक्ष प्राणलाल माने,आनंदराव कांबळे, वंचितचे तालुकाध्यक्ष संजय जाधव, रेखाताई जाधव, बाळासाहेब जगताप,आत्माराम कांबळे, कार्यकर्ते आदी विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, कार्यकर्ते, उपासक व उपासिका मोठ्या संख्येनी उपस्थित होत्या. राहुल रोकडे यांचा अनेक मान्यवरांनी भेटवस्तु, पुस्तक, शाल, पुष्पगुच्छ, पुष्पहार आदी प्रकाराने सत्कार केला. मुख्याध्यापक सुनील माने यांनी सूत्रसंचालन केले. याकामी, भारतीय बौद्ध महासभेचे विभागीय अध्यक्ष भानुदास सावंत,सुदाम रोकडे,राजेंद्र सावंत ,गौतम माने साहेब,जगदणी आण्णा विजय भंडारे निवास लोखंडे मनोज भंडारे आदी मान्यवरांच्या मार्गदर्शनानाखाली कार्यकर्त्यानी अथक असे परिश्रम घेतले. समारोपप्रसंगी सर्वानी मिष्टान्न भोजनांचा आस्वाद घेतला.

आयोध्या पती प्रभु श्री राम मुर्ति स्थापना दिन बोथी गावात उत्साहात संपन्न



चाकूर/लातूर ■ नवनाथ डिगोळे

ह. भ. प. श्री तुकाराम महाराज पाटील (आलगरवाडीकर)याची किर्तनरूपी सेवा

बोथी ता चाकूर येथे ह. भ. प. श्री तुकाराम महाराज पाटील आलगरवाडीकवर याचे सुश्रुत कर्तनाची सेवा झाली या वेळी गावातील सर्व श्रोते मंडळीनी किर्तनाचा आनंद घेतला व तसेच मृदगाचार्य श्री हरिमहाराज पाटील (रुईकर) व ? गायनाचार्य श्री जानकीराम महाराज (कंधारकर) होते तसेच महाराजांनी किर्तनामधे प्रभु श्री राम रामचरित्रा सोबतच समाज प्रबोधनाचे कार्य व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्रावर ही प्रकाश टाकण्याची ? सेवा या ठिकाणी करण्यात आली या प्रसंगी सर्व जाती- धर्माचे लोक लहान थोर स्त्री-पुरुष यानी यात मोठ्या संखेने सहकार्य करत सहभाग नोंदवला .

तसेच गावातील कारसेवक श्री ज्ञानोबा घुगे महाराज यांचा सत्कार करून त्यांचे थोडक्यात मनोगत व्यक्त करण्यात आले.

अपात्रतेच्या फेरीतुन आ.शिंदे सलामत ! रामभाऊ साठे यांचे नवस पात्र ठरले !!



सातारा ■ जीवन मोहिते

अपात्रतेची टांगती असणाऱ्या आमदारांची विधान सभेचे अध्यक्ष यांनी सुटका केली आहे.त्यात आ.महेश शिंदेही पात्र ठरले आहेत. त्यासाठी त्यांचे कट्टर कार्यकर्ते रामभाऊ साठे यांनी नवस केला होता.

याबाबतचे वृत्त असे,रामभाऊ साठे यांनी मांसाहार वर्ज्य केला होता.शिवाय,दाढी-मिशाही वाढवलेल्या होत्या.मात्र,आ.शिंदे यांच्यावरील कारवाई योग्य झाली आहे.ते आमदार म्हणून पात्र ठरल्याने जे नवस साठे यांनी केले होते.नवस पूर्ण झाल्याने त्यातुन मुक्त होण्यासाठी आमदार यांच्याकडे साठे यांनी परवानगी मागितली आहे.असे निष्ठावंत असलेले कार्यकर्ते दुर्मिळच आढळुन येत आहेत.

वृक्षारोपण केल्याने आठवणी चिरंतन राहतील:गौतम माने

सातारा ■ जीवन मोहिते



वाठार,(किरोली) येथे दिवंगत प्रल्हाद मारुती माने यांच्या जलदान विधी व? शोकसभेचे औचित्य साधून आम्रवृक्षाचे रोपन करणेत आले.त्या वेळी ते बोलत होते.दि.२२ जानेवारी रोजी वाठार येथे दिवंगत प्रल्हाद माने यांच्या शोकसभेचे व जलदान विधीचे आयोजन केले होते. वृक्षारोपण केलेने ऑक्सिजनची वाढ होणेस मदत होईल.वातारण शुध्द राहून पाऊस वेळेवर पडण्यास हातभार लागेल.व ज्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृक्षारोपण केले त्यांची आठवण ज्या ज्या वेळी आपण त्या वृक्षाच्या छायेत येऊ, त्या वृक्षाची फळे खाऊ त्या त्या वेळी चिरंतन आठवण आल्याखेरीज राहणार नाही.या पुढे हा उपक्रम आपल्या परिसरातील सर्वांनी अवगत करावा असे आवाहन गौतम माने यांनी केले.

प्रल्हाद माने यांनी देशसेवा करून ते सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या पश्चात त्यांना दोन मुले व तीन मुली सुना नातवंडे दोन भाऊ बहिण,त्यांची मुले सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.

त्यांचा एक मुलगा व मुलगी शिक्षक असून शिक्षणा सारख्या पवित्र क्षेत्रात काम करत आहेत.एक मुलगा फौज मध्ये देशसेवा बजावत आहे.

सदर कार्यक्रमास बौध्दाचार्य किशोर गायकवाड, माजी केंद्रप्रमुख गौतम माने,झएद विजय माने, साहेबराव माने, अतुल माने,सुमा माने, गौतमी माने,त्यांच्या पत्नी वत्सला माने,मुले महेंद्र,रविंद्र, तीन मुली, भाऊ विलास माने, विलास माने,पुतणे विनोद,सेवक, हणमंत,संतोष,निवास माने व वाठार येथील माने कांबळे, परिवार व पै पाहुणे इ.मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वडवणीत २३ जानेवारी पासून खुल्या प्रवर्गाचे सर्व्हेक्षण;मराठा आरक्षण संदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाचे कामकाज

बीड ■ गितांजली लव्हाळे

मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने राज्य मागासवर्ग आयोगाच्या निर्देशानुसार दि.२३ जानेवारी पासून खुल्या प्रवर्गाचे वडवणी शहरात सर्व्हेक्षण होणार आहे. या सर्व्हेक्षण कार्यक्रमात वडवणी शहरातील नागरिकांनी योग्य माहिती देऊन सहकार्य करावे असे आवाहन नगरपंचायत मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांनी केले आहे.

मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने राज्य मागासवर्ग आयोगाच्या निर्देशानुसार दि.२३ जानेवारी पासून मराठा समाजासह खुल्या प्रवर्गातील इतर समाजाचे देखील सर्वेक्षण करण्याचे काम सुरू करण्यात येणार आहे. वडवणी नगरपंचायत हद्दीत सदरील सर्व्हेक्षण करण्यासाठी ३९ प्रगणक व ३ पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्व्हेक्षणासाठी मर्यादित कालमर्यादा देण्यात आली असून हे सर्व्हेक्षण दि. २३ जानेवारी ते ३१ जानेवारी पर्यंत पुर्ण करावयाचे असल्याने खुल्या प्रवर्गातील जे जे समाज व जाती येतात या सर्व लोकांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी या कामी नियुक्त केलेल्या कर्मचारी व अधिकारी यांना सहकार्य करुन लवकरात लवकर सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी मदत करावी, जेणेकरून राज्य मागासवर्ग आयोग सर्व माहिती शासनास तात्काळ सादर करील.

सर्वेक्षणाच्या अनुषंगाने वडवणी शहरातील मराठा समाजासह खुल्या प्रवर्गातील सर्व समाजाच्या नागरिकांनी आपली योग्य माहिती प्रगणक कर्मचाऱ्यांना देऊन सहकार्य करावे असे आवाहन वडवणी नगरपंचायतचे मुख्याधिकारी श्री.चंद्रकांत चव्हाण यांनी केले आहे.

लातूर शहरामध्ये मिरवणुकीचा उत्साह; चिमुकल्यांसह अबालवृद्ध नागरिकांचा मिरवणुकीत सहभाग

दै, जनप्रभात मराठवाडा उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित



लातूरः- अयोध्येत आज होणाऱ्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त लातूरमध्ये रविवारी मोठ्या जल्लोषात मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील आबालवृद्ध नागरिकांनी या मिरवणुकीत मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त रामभक्तांनी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. विविध संस्था, संघटना, मंडळांचे कार्यकर्ते या कार्यक्रमांचे मोठ्या उत्साहाने आयोजन करीत आहेत. व्यापारी वर्गाचा उत्साहही वाखणण्याजोगा आहे. गांधी चौक, हनुमान चौक, सराफ लाइन, गंजगोलाई, विवेकानंद चौक, ठाकरे चौक, छत्रपती शिवाजी चौकातील व्यापाऱ्यांनी समोरच्या दर्शनी भागातील रस्त्यावर ही विद्युत रोषणाई केली आहे.

शहराच्या विविध भागांत रविवारीच रामरथाच्या मिरवणुकीचे आयोजन केले आहे. महिला, तरुणांचा उत्साह दिसून येत आहे. लातुरातील पुरातन श्रीराम मंदिरात विविध कार्यक्रम होत आहेत. माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी सूरतशहावली दर्गाला चादर अर्पण करून त्यांच्या परिसरात सुरुवात केली आहे.

लातुरातील जुना औसा रोड भागातील प्रभाग क्रमांक १७ मधील नागरिकांनी एकत्र येत मिरवणूक काढली आहे. या यात्रेत मंदिर विश ?वस्त इंद्रजित ठाकूर, उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, नगरसेवक शोभा पाटील, व्यंकटेश कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती आहे. या यात्रेत भजनीमंडळ, भगवे वस्त्र परिधान केलेल्या महिला, तरुणांचा मोठा सहभाग आहे. परिसरातील सिद्धिविनायक मंदिर, साईबाबा मंदिर, ओंकार हनुमान मंदिर परिसरात मिरवणूक काढण्यात येणार असून, अयोध्या कॉलनीतील श्रीराम मंदिरात त्याचा समारोप होणार आहे.

श्री केशव मित्र मंडळच्या वतीने मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. केशवनगरमधील वीर हनुमान मंदिर येथून निघालेली ही मिरवणूक केशवनगर, अंबा हनुमान, कॉकसिट कॉलेज, शारदा कॉलनी, बँक कॉलनी, केशवनगर, इंडियानगर या भागातून काढण्यात आली. मिरवणुकीत मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते. नागरिकांनी जागोजागी यात्रेचे फटाके वाजवून स्वागत केले. सडा, रांगोळ्या, भगव्या पताका, श्रीराम मूर्तीचे भव्य फलक यांनी रस्ते सजले होते. मिरवणुकीत रामरथावर श्रीराम, लक्ष्मण, सीता व हनुमान रूपात मुले विराजमान झाली होती. भव्य श्रीराम प्रतिमा वेगळ्या रथावर लावण्यात आली होती. मिरवणुकीत उंट, घोडे सजलेल्या स्वारासहित सहभागी झाले. मिरवणूक यशस्वी करण्यासाठी केशव मित्र मंडळाचे अध्यक्ष सर्वोत्तम कुलकर्णी, माजी महापौर दीपक सूळ, माजी नगरसेविका सपना किसवे, कीर्ती धूत, विलास आराध्ये, मुरलीधर दीक्षित, किशोर कुलकर्णी, कांचन भावठाणकर, संजय निरगुडे, पोटे, अजय सूळ, अजय रेणापूरे आदींनी परिश्रम घेतले.

शिवणी जामगा येथील पोलिस पाटील पदी आनंद गंगाधर पाटील जामगे यांची निवड !

दै, जनप्रभात लोहा प्रतिनिधी ■ विश्वनाथ शिंदे



शिवणी (जामगा) येथील पोलिस पाटील पदी आनंद गंगाधर पाटील जामगे यांची निवड समितीने जाहिर केली आहे. पूर्वी पोलिस पाटील पद वंश परपराग त पद्धतीने भरले जात होते पण या पदाकरिता आता परिक्षा लेखी व तोंडी घेऊन लोहा व कंधार तालुक्यातील १७० गावातील पोलिस पाटील पदाची निवड करण्यात आली आहे यापूर्वी पोलिस पाटील म्हणून माधव किशनराव जामगे यांनी काम पाहिले होते तर आता निवड पधदतीने पोलिस पाटील पदावर नियुक्ती झालेले आनंद जामगे पहिले पोलीस पाटील माधवराव जामगे यांचे पुतण्या ने पुन्हा एकदा निवड पध्दतीने शिवणी (जामगा) येथील पोलिस पाटील पदी यांची निव ड झाल्यामुळे गावकरी यांनी आनंद युक्त केला आहे या अगोदर आजोबा किशनराव पोलिस पाटील यांनी लोहा कंधार तालुक्या मध्ये पोलिस पाटील म्हणून नाव लौ कि न मिळवला होता आता पण निवड पद पद्धतीने निवड होऊन शासनाने योग्य उमेदवाराची निवड केली अशी प्रतिक्रिया गावातील जनता व्यक्त करत आहे ,

विरोधी पक्षनेत्यांकडे उबाळे यांचे साकडे.अन्यथा दि.२६ ला आत्मदहन करणार

सातारा ■ जीवन मोहिते



मुख्य अधिकारी यांच्यावरती भ्रष्टाचाराचे आरोप केले होते.त्यामुळे कोरेगाव नगरपंचायतीच्या चौदा नगरसेवकांनी खोटे आरोप करून नाहक बदनामी केली आहे. तेव्हा मुख्य अधिकारी व नगरसेवकांची चौकशी करून न्याय द्यावा.अशी मागणी विधान परिषदेचे विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांच्याकडे आ.शशिकांत शिंदे व कार्यकर्त्यांच्या समवेत रमेश उबाळे यांनी केली आहे.

आ.शशिकांत शिंदे यांनी विधी मंडळाच्या अधिवेशनात विधानपरिषदेमध्ये लक्षवेधीद्वारे प्रश्न उपस्थित केला होता. तरीसुद्धा कोरेगाव नगरपंचायतीतील भ्रष्ट अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही.तेव्हा रमेश उबाळे यांनी निवेदनात असे म्हटले आहे की, 'सखोल चौकशी करून तात्काळ कोरगाव नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी यांना निलंबित करावे. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये कोरेगाव नगरपंचायतीचे चौदा नगरसेवक व शिवसेना शिंदे गट भाजप पदाधिकारी यांनी आपल्याकडे येऊन माझ्या विरोधात खोटे आरोप करून निवेदन दिले आहे. मी याआधीही खूप आंदोलने केली आहेत. माझ्याकडे सबळ पुरावे असल्याशिवाय मी कोणतेही आंदोलन करत नाही. मुख्यअधिकारी यांच्या विरोधात माझ्याकडे सर्व कागदपत्रे - पुरावे आहेत. माझ्यावरती बिनबुडाचे आरोप करण्यात आलेले आहेत.जर मी कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याला धमकावून खंडणी घेतली असेल तर मला त्वरित अटक करावी. जर मी अनधिकृत बांधकामे बांधली असतील तर आजच्या आज जेसीबी लावून पाडून टाकावीत.आपल्याकडे पुरावे असतील तर तात्काळ माझ्यावरती गुन्हे दाखल करावा. मी कोणत्याही नगरसेवक अथवा नेत्यावरती आरोप केला नव्हता. कोरेगाव नगरपंचायतीमध्ये भ्रष्ट कारभार चालू आहे.यासंदर्भात वारंवार तक्रारी माझ्याकडे आल्या होत्या. त्यानंतर मी निवेदन दिले आहे. परंतु भ्रष्ट कारभार व अधिकाऱ्याच्या विरोधात निवेदन दिल्यानंतर चौदा नगरसेवकांना अचानक आंदोलनाच्या चौथ्या दिवशी मुख्य अधिकारी कोरेगाव नगरपंचायत यांच्याविषयी व त्यांच्यासोबत उभे राहण्याची भूमिका सुचली. याचा अर्थ, असा समजावा का? की,अलीबाबा व चौदा चोर ? या भ्रष्टाचारामध्ये आपलेही पोल खोल होईल. या भीतीने हे निवेदन देण्यात आले का ? मी केलेल्या आरोपामध्ये आपलाही सहभाग आहे का ?अचानक कोरेगाव नगरपंचायत मुख्य अधिकारी यांच्या पाठीशी व सोबत उभी राहण्याची भूमिका संशयास्पद आहे. एकूणच कोरेगावमध्ये चाललेला कारभार पाहता एकाच रस्त्याला दोन वेळा निधी खर्च करणे,भंडारे कॉलनी मधला रस्ता एकदा डांबरी सडक, एकदा ट्रीमिक्स काँक्रीट का ? नगरपंचायतीची बॅटरी घोटाळा पुराव्यासह उघडकीस आणला, एक केळे विकणारा,एकाचे किराणा मालाचे दुकान, आपल्याला बॅटरी व रिपेरिंगची सर्व्हिस कसा देऊ शकतो ? हा अभ्यासाचा विषय आहे.कोणता तरी बोगस माणूस उभा करून खोटे, लायसन देऊन आपण लाखो रुपयाचा भ्रष्टाचार करत आहात. यामध्ये आम्ही आवाज उठवल्यानंतर चौदा नगरसेवक जागे होतात ! माझे खच्चीकरण करण्यासाठी, माझी बदनामी करण्यासाठी निवेदन देतात. ही लाजिरवाणी बाब आहे. एक मागासवर्गीय समाजातील युवक, भ्रष्टाचारा विरोधात लढा उभा करतो. मग त्याला अडवायचं कसं? त्याची फॅमिली त्याचा व्यवसाय याच्या वरती घाला घालून, त्याला थांबवण्याचा प्रयत्न करणं कितपत योग्य आहे? कोरेगाव आरक्षणाविषयी खूप अमिष दाखवली जातात.कूपर या उद्योगपतींचे आरक्षण कसे उठवले ? सर्वसामान्य शेतकऱ्याच्या जमिनीवरच आरक्षण का उठत नाही ? आरक्षण उठवतो आमच्या सोबत या.अशी आमिषे दाखवण्याचा उद्योग कोण करत आहे ? मी दिलेल्या निवेदनातील प्रश्न व माहितीच्या अधिकारांमध्ये विचारलेला प्रश्न एकच असून, उत्तरे मात्र दोन का ? एका ठिकाणी साडेतीन कोट रुपये अखर्चित निधी मधून वापरला जातो असं उत्तर दिलं जातं व दुसऱ्या माझ्या निवेदनाला चौदा वित्त आयोगाचे पैसे वापरले. असं उडवाउडवीचे उत्तर देणे. हे मुख्य अधिकाऱ्यांचे काम आहे का ? मी केलेल्या आरोपाची कागदपत्र देणे अपेक्षित आहे.परंतु कारण देऊन माझ्या निवेदनाला उत्तर देणे कितपत योग्य आहे. अधिकाऱ्यावरती एवढे गंभीर आरोप करत असताना त्यांनी सर्व कागदपत्र देणे अपेक्षित आहे . परंतु नगरपंचायतीच्या लेटर हेडवरती माझी व माझ्या कुटुंबाची बदनामी करणे हे अधिकाऱ्याला सुचते.पण सत्य वास्तविक कागदपत्र देणे यांना जमत नाही.अनअधिकृत बांधकामांमध्ये किती मायाजाल जमा केला ? याची सुद्धा अँटीकरप्शनने माहिती घेतली पाहिजे .कोरेगाव मंडईचे काम चालू आहे.सातारा जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांनी कोणतीही परवानगी दिली नाही. कोरेगाव तहसीलदारांनी कोणतीही उत्खननाची परवानगी दिलेली नाही. तरीसुद्धा बेकायदेशीर रित्या उत्खनन करून माती विकली गेली आहे. त्या कॉन्ट्रॅक्टरवर फौजदारी गुन्हा आजतागायत का दाखल झालेला नाही ? प्रशासन,प्रशासकीय अधिकाऱ्यावरती कोणाचा दबाव आहे ? हे देखील जाहीर करावे. वारंवार माझे आंदोलन दडपण्यासाठी माझी नाहक बदनामी केली जाते. माझ्या कुटुंबाची बदनामी केली जाते. माझ्या व्यवसायिक ठिकाणी कोणी फोन करून नोटिसा लावायला सांगितले ? याची देखील चौकशी झाली पाहिजे. मी करत असलेले आरोप खोटे असतील तर माझ्यावरती गुन्हा दाखल करा.मला फासावरती लटकवा. परंतु, फक्त मागासवर्गीय समाजाचा युवक आहे. म्हणून मला धमकावून माझ्यावरती खोटेआरोप व षडयंत्र करून नाहक बदनामी करत आहेत .याचाच अर्थ आपले सुद्धा हात ह्या भ्रष्टाचारात बरबटलेले आहेत का ? असा सुद्धा प्रश्न आपण निवेदन दिल्यामुळे निर्माण झालेला आहे. तरी या विषयाची सखोल चौकशी करून मी दोषी आढळल्यास माझ्यावरती गुन्हा दाखल करा. मुख्यअधिकारी भ्रष्टाचारी आढळल्यास त्यांना तात्काळ निलंबित करून घरचा रस्ता दाखवावा. अन्यथा, दि.२६ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर मी आत्मदहन करेन. माझे काही बरे वाईट झाल्यास, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी व सर्व शासकीय अधिकारी जबाबदार असतील.'

अवघ्या ८४ सेकंदांच्या मुहूर्तावर रामाची प्राणप्रतिष्ठापना पूर्ण

दै, जनप्रभात मराठवाडा
उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित



अयोध्याः- अवघ्या देशाला ज्या क्षणाची आतुरता होती, तो ऐतिहासिक क्षण आज आला. उत्तर प्रदेशातील अयोध्येतील राम मंदिराची प्राणप्रतिष्ठा पंतप्रधान मोदींच्या हस्ते पार पडली आहे. अवघ्या ८४ सेकंदाच्या मुहूर्तावर रामललाची प्राणप्रतिष्ठा पार पडली.सध्या अयोध्येसह देशभरात एक अनोखा उत्साह आहे. अयोध्येतील राम मंदिर सुंदर फुलांनी सजलं आहे.

अवघ्या ८४ सेकंदांचा शुभ मूहूर्त

राम मंदिरासाठी २२ जानेवारीचीच निवड का?

२२ जानेवारीला अनेक शुभ योग

म्हणून झाली २२ जानेवारीची निवड

राम मंदिराच्या अभिषेकासंदर्भात लोकांमध्ये प्रचंड उत्साह होता. आता राम मंदिरात मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापनेसाठी २२ जानेवारी २०२४ हा दिवसच का निवडण्यात आला आणि आजच्या मुहूर्ताबद्दल इतकं खास काय होतं? सगळं सविस्तर जाणून घेऊया.

अवघ्या ८४ सेकंदांचा शुभ मूहूर्त

अयोध्येत बांधण्यात आलेल्या राम मंदिरात रामल्लांच्या मूर्तीची स्थापना करण्यासाठी अवघ्या ८४ सेकंदांचा शुभ मूहूर्त होता. हा शुभ मुहूर्त २२ जानेवारी २०२४ रोजी दुपारी १२ वाजून २९ मिनिटं ८ सेकंदांना सुरू होऊन तो दुपारी १२ वाजून ३० मिनिटं ३१ सेकंदांनी संपला. या शुभ मुहूर्तावर रामललाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. आता रामलला अयोध्येतील राम मंदिरात विराजमान झाले आहेत. शेकडो भाविक या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार देखील झाले.

राम मंदिरासाठी २२ जानेवारीचीच निवड का?

हिंदू कॅलेंडरनुसार, २२ जानेवारी ही पौष महिन्यातील शुक्ल पक्षातील द्वादशी तिथी आहे. नक्षत्र मृगाशिरा आणि ब्रह्म योग सकाळी ८:४७ वाजेपर्यंत होता, त्यानंतर इंद्र योग सुरू झाला. ज्योतिष्यांच्या मते, २२ जानेवारी ही कर्म द्वादशी आहे. ही द्वादशी तिथी भगवान विष्णूला समर्पित आहे. या दिवशी भगवान विष्णूने कासवाचं रूप धारण केल्याचं सांगितलं जातं. धार्मिक ग्रंथांनुसार, या दिवशी भगवान विष्णूने कासवाचा अवतार घेतला आणि समुद्रमंथनात मदत केली. भगवान श्री राम हे भगवान विष्णूचे अवतार आहेत, म्हणून हा दिवस अत्यंत शुभ मानला जातो आणि हा दिवस राम मंदिराच्या उद्घाटनासाठी निवडण्यात आला आहे.

२२ जानेवारीला अनेक शुभ योग

ज्योतिषांच्या मते, २२ जानेवारीला अनेक शुभ योग तयार झाले आहेत. या दिवशी अभिजीत मुहूर्त, सर्वार्थ सिद्धी योग, अमृत सिद्धी योग आणि रवि योग असे तीन शुभ योग तयार होत आहेत. कोणताही शुभ कार्य करण्यासाठी हा दिवस अतिशय शुभ मानला जातो. या योगांमध्ये कोणतेही काम केल्याने व्यक्तीला सर्व प्रकारच्या कामात यश मिळतं. सूर्यदेव देखील मकर राशीत विराजमान असल्याने या दिवसाचं महत्त्व वाढलं आहे.

म्हणून झाली २२ जानेवारीची निवड

धार्मिक मान्यतेनुसार, भगवान रामाचा जन्म अभिजीत मुहूर्तावर मृगशीर्ष नक्षत्र, अमृत सिद्धी योग आणि सर्वार्थ सिद्धी योगाच्या संयोगादरम्यान झाला. हे सारे शुभ योग २२ जानेवारी २०२४ रोजी पुन्हा एकदा जुळून आले आहेत. त्यामुळेच अयोध्येमध्ये राम मंदिरात रामलल्लांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी २२ जानेवारीची निवड करण्यात आली.

५०० वर्षानंतर प्रभू श्रीराम अयोध्येत विराजमान, पंतप्रधान मोदींकडून विधीवत प्रतिष्ठापना



दै, जनप्रभात मराठवाडा
उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित

अयोध्याः- संपूर्ण देशाचं स्वप्न आज पूर्ण झालं. अखंड भारत ज्या क्षणाची आतुरतेनं वाट पाहत होता तो क्षण आज याचि देही, याचि डोळा अवघ्या देशानं अनुभवला. न भूतो न भविष्यती अशा अभूतपूर्ण सोहळ्यात प्रभू श्रीरामाची अयोध्येतील भव्यदिव्य राम मंदिरात विधीवत प्रतिष्ठापना करण्यात आली. १२.२९ या शुभ मुहूर्तावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रभू श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा संपन्न झाली.

तब्बल ५०० वर्षांनंतर प्रभू श्रीराम विधीवत राम मंदिरात विराजमान झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनुष्ठान पूर्ण केलं. यावेळी हेलिकॉप्टरमधून पृष्पवृष्टी करण्यात आली. या सोहळ्यासाठी अयोध्यानगरी सजली होती. कलाकार, खेळाडूंसह देशभरातील नागरिक अयोधामध्ये आले होते. प्राणप्रतिष्ठावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत सरसंघचालक मोहन भागवत, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ मंदिराच्या गाभाऱ्यात उपस्थित होते. प्रभू श्रीरामाच्या प्राणप्रतिष्ठापनेचा हा आनंदाचा सोहळा जगभरातील लोकांनी 'याची देही याची डोळा पाहिला. हा सोहळा नयनरम्य होता, उपदेशात्मक होता, ऊर्जात्मक होता. जीवनाला दिशा व जगण्याला उद्देश देणारा ठरला.

तो ऐतिहासिक क्षण आलाचष्ठ प्रभू श्रीराम हे मंदिरात विराजमान झाले, ज्या क्षणाची सारे राम भक्त गेल्या ५०० वर्षांपासून वाट पाहत होते तो क्षण अख्ख्या देशाने अनुभवला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विधीवत पूजा करण्यात आली. यावेळी संपूर्ण अयोध्या ही राममय झाली आहे.

खासदार सुधाकरराव श्रृंगारे यांनी उभा केलेल्या श्रीरामाच्या दरबाराची वल्ड रेकॉर्डमध्ये झाली नोंद

दै, जनप्रभात मराठवाडा
उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित



अहमदपूरः- संपूर्ण देशभर २२ जानेवारी २०२४ रोजी रामलीला उत्सव साजरा होतअसून आज दिवाळी साजरी झाली. लातूर लोकसभा मतदारसंघाचे दानशूर तथा लोकप्रिय खासदार सुधाकरराव श्रृंगारे यांच्या पुढाकारातून अहमदपूर येथे श्रीरामाच्या दरबाराच्या प्रतिकृतीचे होमहवन करून विधीवत पुजन करून खासदार सुधाकरराव श्रृगारे यांच्या हस्ते १९ जानेवारी रोजी लोकार्पण झाले होते.

गुजरात येथून आलेले वल्ड रेकॉर्डचे चेअरमन पवण सोळंकी यांनी सदरील रामदरबाराची वल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाल्याची घोषणा करून पदक व प्रमाणपत्र खासदार सुधाकरराव श्रृगारे यांच्या पत्नी सौ. संगितामानलताई श्रृगारे, मुलगी सौ. सुप्रीया पायाळ, जावाई शंतनू पायाळ, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते तथा अहमदपूर विधानसभा निवडणुक प्रमुख गणेश दादा हाके पाटील यांना वल्ड रेकॉर्डचे चेअरमन पवण सोळंकी यांनी प्रदान केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष ॲड. भारत चामे, माजी नगराध्यक्षा सौ. अश्विनी कासनाळे,भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी,धैर्यशील देशमुख, चाकुरचे तालुका अध्यक्ष वसंत डिगोळे,अहमदपूर चे तालुका अध्यक्ष प्रताप पाटील, श्रीकांत देशमुख,शहराध्यक्ष सुशांत गुणाले,चंद्रशेखर डांगे, डॉ. सिद्धार्थ सुर्यवंशी, बालाजी गुट्टे,माणिक नरवटे,बालासाहेब होळकर,अमित रेड्डी,निखील कासनाळे, महीला तालुका अध्यक्षा जयश्री केंद्रे,रामनाथ पलमटे,धनजंय कोतावार, संगमेश्वर निला,संतोष कोटलवार, संजय माने,जिवण गायकवाड,प्रदीप वट्टमवार, पिंठू नाईक आदीजण उपस्थित होते.

अहमदपूर येथील थोडगा रोडवरील निजवंते नगर मधील भव्य प्रांगणात श्रीराम, लक्ष्मण, सिता, हनुमान यांच्या भव्य दिव्य दोन लाख तिस हजार पणत्यामध्ये प्रतिकृती उभारण्यात आल्या आहेत. सदरील श्रीरामाच्या दरबाराच्या प्रतिकृती उभ्या करुन अहमदपूर सह लातूर जिल्ह्यातील राम भक्तांचा खासदार सुधाकरराव श्रृगारे यांनी आनंद द्विगुणित केला आहे. यावेळी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते व हजारो महिला पुरुष रामभक्त यावेळी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बालाजी सुळ यांनी केले तर आभार भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी यांनी मानले.

कॉंग्रेसच्या वंचित मराठा आघाडीच्या तालुकाअध्यक्षपदी रामदास धुमाळ यांची निवड;कॉंग्रेस पक्षाचे जिल्ह्याचे नेते महेश बापु ढमढेरे यांची उपस्थिती

पुणे(शिक्रापूर) ■ रिजवान बागवान



शिरूर तालुक्यातील नामांकित औद्योगिक क्षेत्र असलेल्या व पुण्य भुमी असलेल्या सणसवाडी येथील रहिवाशी असलेले सामाजिक कार्यकर्ते रामदास कुंडलिक धुमाळ यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसोबत राष्ट्रीय नेते राहुलजी गांधी साहेब यांच्या नेतुत्वावर विश्वास ठेवुन पुणे जिल्हा कॉंग्रेस कमिटिचे नेते महेश बापु ढमढेरे तसेच शिरूर तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष वैभव तात्या यादव यांच्या मार्गदर्शनाखाली कॉंग्रेस पक्षात सणसवाडी येथे जाहिर प्रवेश केला आहे.त्यांच्या प्रवेशाबद्दल जिल्हा व तालुका कॉंग्रेस कमिटीने स्वागत केले असुन रामदास धुमाळ यांचा सन्मान करून पुढील वाटचालीस मनपुर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

सामाजिक कार्यकर्ते रामदास धुमाळ यांना कॉंग्रेस पक्षाच्या वतीने शिरूर तालुका कॉंग्रेस कमिटी अंतर्गत वंचित मराठा आघाडीचे शिरूर तालुका अध्यक्ष पद देऊन काम करण्यासाठी मोठी जबाबदारी देण्यात आली आहे.

आपण कॉंग्रेस पक्षाच्या बळकटी करणासाठी तसेच पक्षवाढी राष्ट्रीय नेते राहुलजी गांधी साहेब यांच्या नेतुत्वाखाली व जिल्हा कॉंग्रेसचे नेते महेश बापु ढमढेरे,तालुका अध्यक्ष वैभव तात्या यादव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रामाणिकपणे काम करणार असुन तळागाळातील वंचितांच्या विविध प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत रामदास धुमाळ यांनी व्यक्त केले आहे.

सदर कार्यक्रमाप्रसंगी शिरूर तालुका कॉंग्रेस कमिटिचे उपाध्यक्ष डॉ सुमित शेलार,संजय गांधी निराधार समितीचे सदस्य सचिन पंडित,चंद्रकांत गायकवाड,विष्णु वाघ,सागर घोडसे,अविनाश घारे,मनोहर नवगिरे,मनोज लोंढे,बापु शेळके,सुधाकर लोखंडे,संतोष फुटाणे,आप्पा लोंढे,गजानन बनसोड,गजानन माने,गजानन मोरे,शांताराम मोरे,प्रकाश मोरे,सावंत साहेब आदि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठा समाज आणि खुला प्रवर्गाचे सर्वेक्षण



परभणी ■ अरविंद कांबळे

परभणी, आज रोजी २२ जानेवारी २०२४ गोंधळ सम्राट राजारामबापू कदम सांस्कृतिक सभागृह जुना मोंढा पूर्णा येथे मराठा समाज आणि खुला प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्यासाठी तहसील कार्यालयामार्फत नियुक्त केलेल्या प्रवेशक आणि प्रगनक यांना प्रशिक्षण देण्यात आले.

या कार्यक्रमासाठी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी तहसील कार्यालय पूर्णा माधव बोधीकर, नायब तहसीलदार प्रशांत धारकर, गटशिक्षणाधिकारी सूर्यवंशी तसेच नियुक्त केलेले एकूण १७ प्रवेशक व २६० प्रगनक उपस्थित होते.

मर्यादा पुरुषोत्तम श्री राम हे सनातन परंपरेचे पालन करणारे व्यक्ति : डॉ. भीमराय मेत्री

वर्धा ■ प्रतिनिधी

'सनातन परंपरा आणि मर्यादा पुरुषोत्तम श्री राम' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिसंवाद;दीपोत्सव, आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आणि सुंदर कांडचे आयोजन



महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात २२ जानेवारी रोजी अयोध्येत आयोजित श्री राम लला यांच्या प्राण-प्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्याने विश्वविद्यालय आणि महाराष्ट्र राज्य हिंदी अकादमी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'सनातन परंपरा आणि मर्यादा पुरुषोत्तम' श्री राम' या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे अध्यक्ष म्हणून बोलतांना कुलगुरू डॉ. भीमराय मेत्री म्हणाले की सनातन परंपरा ही हजारो वर्षांच्या तपश्चर्येतून निर्माण झालेली आहे, ज्यामध्ये सर्व काही पवित्र आहे. मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्री राम हे त्या सनातन परंपरेच्या मार्गावर चालणारे एक गंभीर व्यक्तिमत्व आहेत. मर्यादा पुरुषोत्तम श्री राम हे लोकांचे तारणहार आहेत. ते उदारतेने परिपूर्ण आहे. ते धैर्याचे पर्वत आहेत. त्यागाचे प्रतीक आहे. ते समरसतेवर विश्वास ठेवणारे आहेत. मर्यादा पुरुषोत्तम श्री राम हे शक्ती, नम्रता आणि सौंदर्याचे उपासक आहेत. याप्रसंगी कुलसचिव डॉ. धरवेश कठेरिया मंचावर उपस्थित होते.

विशेष वक्ते म्हणून ऑनलाइन संबोधित करताना मुंबईचे प्रो. करुणाशंकर उपाध्याय म्हणाले की, आचार्य तुलसीदास, भवभूती, संत नामदेव आणि संत कबीर यांनी आपल्या काव्यात रामाचे उदात्त गुण वर्णन केले आहेत. संत कबीरांनी आपल्या दोह्यात रामाचा जप करण्यास सांगितले आहे. आज जग रामाने भरले आहे. रामाचे लोककल्याणकारी रूप सर्वत्र दिसते. सनातन संस्कृतीचे कल्याण रामाशिवाय होऊ शकत नाही, असे मत चीनच्या क्वांगटोंग विद्यापीठाचे डॉ. विवेकमणी त्रिपाठी यांनी व्यक्त केले. राम हे जगाच्या इच्छेचे आणि लोककल्याणाचेही नाव आहे. वाराणसीचे प्रो. श्रीनिवास पांडे म्हणाले की रामाचे व्यक्तिमत्त्व अफाट आहे. ते जडवाद आणि चेतनेमध्ये अस्तित्वात आहेत. प्रास्ताविक करताना अनुवाद व निर्वचन विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. कृष्णकुमार सिंह म्हणाले की रामाचे संपूर्ण जीवन प्रतिष्ठेचे, ध्येयाचे साक्षीदार आहे. साहित्य विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. अखिलेश कुमार दुबे यांनी राम हे सनातनचे खरे रूप असल्याचे सांगितले. सामर्थ्य, नम्रता आणि सौंदर्य त्यांच्यात आहे असेही ते म्हणाले. परिसंवादाचा शुभारंभ दीपप्रज्वलन व प्रभू श्री रामाच्या फोटोला पुष्प अर्पण करून करण्यात आला. हिंदी साहित्य विभागाच्या प्रो. प्रीति सागर यांनी संचालन केले तर तुलनात्मक साहित्य विभागाचे अध्यक्ष डॉ. रामानुज अस्थाना यांनी आभार मानले. संस्कृत विभागाचे शोधार्थी साहिबुदेव शर्मा यांनी मंगलाचरण सादर केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. या प्रसंगी अधिष्ठातागण, विभागाध्यक्ष, अध्यापक, शोधार्थी एवं विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनकल्याणकारी समारोह निमित्त बसपाचा संकल्प

वर्धा ■ प्रतिनिधी



देशाची सामाजिक परिवर्तनाची महानायिका बहुजन समाज पार्टीची राष्ट्रीय अध्यक्ष तथा उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री आयरन लेडी माननीय बहन कुमारी मायावतीजी यांच्या ६८ वा वाढदिवसाच्या निमत्ताने जनकल्याणकारी समारोह दिनांक २१ जानेवारी २०२४ रोजी, साई मंगल कार्यालय, येथे आयोजीत करण्यात आला. बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. परमेश्वरजी गोणारे यांनी मुख्य मार्गदर्शन केले. बहुजन समाज निर्माण करण्याकरिता संपुर्ण राज्यभर दौरे सुरु आहेत व आदिवासी समाजाला मुख्यप्रवाहा मध्ये जोडुन तयार करणार आहे अशे वक्तव्य दिले प्रमुख अतिथीः- मा. ?ड.सुनिल डोंगरे प्रदेश महासचिव महाराष्ट्र तथा विदर्भ झोन इन्चार्ज यांनी सांगितले की बहन कु. मयावतिजी यांनी मागील महिन्यामध्ये लखनऊ येथे बैठक घेऊन ञ्रि मुळे लोकशाही धोक्यात आहे व कधी ना कधी ञ्रि ची धांधली लक्षात येणार व त्यावर नक्की बंदी येणार आहे. मा. पृथ्वीराज शेंडे, प्रदेश सचिव महाराष्ट्र तथा विदर्भ झोन इन्चार्ज यांनी जुन्या मिशनरी सहकार्याना सोबत घेऊन बहुजन समाज पार्टी ची सत्ता आणू शकतो अश्या प्रकारे विचार व्यक्त केले. तसेच प्रदेश कार्यकारणी सदस्य विदर्भ झोन इन्चाज.र्दादाराव उईकें यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. 'मला तुमच्यापैकी प्रधानमंत्री झालेला पाहायचा आहे' - डॉ. बी.आर. आंबेडकर या बाबासाहेबांच्या संकल्पपुर्तीसाठी बहुजन समाज पार्टीच्या सर्व कार्यकर्त्यांनी संकल्प केला. सदर कार्यक्रमामध्ये बहुजन समाज पार्टी वर्धा जिल्हा अध्यक्ष मा. डॉ. मोहनजी राईकवार सर, जिल्हा प्रभारी नितेश कांबळे,डॉ.विद्या राईकवार जानरावजी ठोंबरे यांनी देखील मार्गदर्शन केले सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा महासचिव अनोमदर्शी भैसारे यांनी केले व आभार धर्मपाल गायकवाड यांनी मानले.कार्यक्रमास जिल्हा प्रभारी दीपक भगत जिल्हा उपाध्यक्ष विलास टेंबरे जिल्हा कोषाध्यक्ष सुनील भगत जिल्हा सचिव सुदेश जवादे बी व्ही एफ संयोजक विजय ढोबळे सिद्धार्थ ढेपे जिल्हा प्रभारी विनोद वंजारी जिल्हा प्रभारी मनीष चौरे जिल्हा प्रभारी सुरेश नगराळे कवडूजी मेश्राम जिल्हा सचिव वर्धा विधानसभा अध्यक्ष दिनेश वाणी विपुल बौद्ध विशाल रंगारी विवेक गवळी अनिता पारिसे शंकर पानबुडे राज खेडकर अरुण शंभरकर राजेश चेन्ने जयंत वासनिक नितीन सुटे नितीन धनंजय आकाश म्हैस्कर एडवोकेट अभिषेक रामटेके ,नितीन नरांजे सुनील रंगारी रवींद्र भगत मोरेश्वर जवादे बंडू थुल अनिल नगराळे मनोज कळसकर अमर गाणार प्रदीप घाडगे गणेश बावणे अमित वासनिक, राकेश कांबळे, नागेश खोब्रागडे,विवेक नाखले शेखर, म्हैस्कर, प्रशांत येसंकर, रोशन मसराम, चंद्रकांत शिंदे, विनोद बोरकर,इजाज शेख, राजू लोहकरे, सोनू मेंढे, प्रकाश कुडमेथे, अंकुश पाटील, श्रीधर कांबळे, एलटी वाळके,प्रकाश बोरचे सलीम भाई, अमोल रंगारी,राजू डोंगरे स्वप्नील बोरकर एडवोकेट शारदा खोबरागडे प्रामुख्याने उपस्थित होते.आयोजनासाठी सुधाकर जूनघरे, गौतम वाकोडे सोपान कांबळे,ओमप्रकाश भालेराव,सुरेश कांबळे,शरद वानखेडे,पुरुषोत्तम लोहकरे,इत्यादी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

आमदार डॉ. पंकज भोयर यांनी प्रभु श्रीरामजी यांच्या सेल्फी पॉइंटचे केले उद्घाटन

वर्धा ■ प्रतिनिधी



सोमवार २२ जानेवारी रोजी अयोध्येतील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता भवन प्रांगणात प्रभू श्री रामजींच्या सेल्फी पॉइंटचे उद्घाटन वर्धा विधानसभा मतदार संघाचे आमदार डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते रिबन कापून करण्यात आले. या प्रसंगी कुलसचिव डॉ. धरवेश कठेरिया व मानविकी व सामाजिक विज्ञान विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. फरहद मलिक यांनी त्याचे अंगवस्त्र, सूतमाला व स्मृती चिन्ह प्रदान करून स्वागत केले. आमदार डॉ. भोयर यांनी प्रभू श्रीरामजींच्या सेल्फी पॉइंट वर सेल्फी काढली. यावेळी प्रो. कृष्ण कुमार सिंह, प्रो. अवधेश कुमार, प्रो. अखिलेश कुमार दुबे, प्रो. जनार्दन कुमार तिवारी, प्रो. आनंद भारती, प्रो. बंशीधर पाण्डेय, प्रो. आनंद पाटील, डॉ. उमेश कुमार सिंह, डॉ. विपिन कुमार पाण्डेय, डॉ. जयंत उपाध्याय, डॉ. बालाजी चिरडे, डॉ. संदीप कुमार वर्मा, डॉ. रवि कुमार, डॉ. कृष्ण चंद्र पाण्डेय, डॉ. जगदीश नारायण तिवारी, डॉ. रणंजय सिंह, डॉ. प्रदीप, बी.एस. मिरगे, डॉ. अमित कुमार विश्वास, अटल पाण्डेय, राजेश अरोड़ा, संगीता मालवीय यांच्या सह मोठ्या संख्येने अध्यापक, कर्मचारी, शोधार्थी व विद्यार्थी रामभक्त उपस्थित होते.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242